अध्याय पंधरावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो श्रीजनार्दन । सकळ सिद्धींचें सिद्धस्थान । सकळ ऋद्धींचें परम निधान । तुझे श्रीचरण सर्वार्थी ॥ १ ॥ निधान साधावया अंजन । नयनीं काळिमा घालिती जन । तेणें काळवंडले नयन । थितें निधान दिसेना ॥ २ ॥ तैसे नव्हती तुझे चरण । करितां चरणरजवंदन । निःशेष काळिमा निरसे जाण । पूर्ण निधान दाविसी ॥ ३ ॥ अंजनें साधितां निधान । तेथ छळावया पावे विघ्न । बळी देऊनि साधिल्या जाण । नश्वरपण तयासी ॥ ४ ॥ तैसे नव्हती तुझे चरण । अवलीळा करितां स्मरण । नित्य सिद्ध अव्यय जाण । निजनिधान ठसावे ॥ ५ ॥ हें साधूनियां निधान । झाले सनकादिक संपन्न । नारदाचें उदारपण । येणेंचि जाण वाखाणें ॥ ६ ॥ वज्रकवच प्रल्हादासी । हेंचि भांडवलगांठी त्यासी । शुकादि वामदेवांसी । महिमा येणेंसीं पावले ते ॥ ७ ॥ व्यासवाल्मीकि महावेव्हारे । येणेंचि भांडवलें झाले खरे । त्यांचेनि भांडवलें लहान थोरें । छेदूनि दरिद्रें नांदती ॥ ८ ॥ त्या सद्गुरूचें श्रीचरण । परम निधींचें निधान । एका जनार्दना शरण । हें आम्हां परिपूर्ण भांडवल ॥ ९ ॥ येणेंचि भांडवलें प्रस्तुत । प्राप्त झालें श्रीभागवत । तेथ उद्धवासी श्रीअनंत । ज्ञानमथितार्थ सांगत ॥ १० ॥ त्या दोघांची एकांत मातू । प्रकट जाहली जगाआंतू । हा परीक्षितीचा विख्यातू । उपकार लोकांतू थोर जाहला ॥ ११ ॥ ज्याचे श्रद्धेच्या आवडीं । शुक पावला लवडसवडी । तेणें गुह्य ज्ञानाची गोडी । प्रकट उघडी दाखविली ॥ १२ ॥ त्या शुकाचें नवल महिमान । कानीं न सांगतां गुह्य ज्ञान । श्रवणें तोडोनि भवबंधन । परीक्षिती जाण उद्धरिला ॥ १३ ॥

ओंकाररूप जनार्दनाला नमस्कार असो. तुझे चरण सर्व सिद्धींचें सिद्धस्थान आहेत, सर्व निधींतील परमनिधान आहेत. १ भूमींत पुरून ठेवलेलें धन दिसण्यासाठीं लोक डोळ्यांत अंजन घालितात; पण त्यामुळें डोळे काळवंडतात व असलेले पदार्थहि दिसेनासे होतात. २ तुझे चरण तसे नाहींत. तुझ्या पायांच्या धुळीला वंदन केलें असतां पातकांचें समूळ निरसन होतें आणि तूं परब्रह्मस्वरूप दाखवितोस. ३ डोळ्यांत अंजन घालून पुरलेलें धन काढूं लागलें असतां तेथें पिशाच, समंधादि विघ्नें छळ करावयास येतात. त्यांना एखादा बळी देऊन जरी तो ठेवा स्वाधीन करून घेतला तरी त्याला अशाश्वतपणा असतोच, ४ पण तुझे चरण तसे नाहींत. त्यांचें स्मरण सहज जरी केलें, तरी नित्य सिद्ध व अविनाशी आत्मस्वरूपाचा ठेवा सांपडतो. ५ हाच ठेवा मिळवून सनकादिक संपन्न झाले. याच्यामुळेंच नारदाच्या औदार्याची स्तुति गातात. ६ सद्गुरुचरणच प्रल्हादाचें रक्षण करणारें वज्रकवच होय. त्याच्या पदरीं हेंच भांडवल होतें. शुक-वामदेवादिकांचा याच्याच योगानें महिमा वाढला. ७ याच भांडवलावर व्यास-वाल्मीकि मोठे सावकार बनले. (रामायण-भारतासारख्या ग्रंथाचा एवढा व्यवहार केला.) त्यांच्या या भांडवलावर लहान-थोर आपलें आत्मज्ञानाविषयींचें दारिद्र्य घालवून आत्मबोधानें मोठें संपन्न झाले. ८ अशा त्या सद्गुरूचे चरण सर्व ठेव्यांतील परम निधि आहेत. एकनाथ जनार्दनाला शरण गेला आहे. सद्गुरूला शरणागत होणें हेंच आमचें भांडवल आहे. ९ याच भांडवलामुळें प्रस्तुत श्रीभागवत आम्हांला लाभलें. त्यांत श्रीअनंत उद्धवाला ज्ञानाचें रहस्य सांगत आहे. १० त्या दोघांचें खरोखर हें एकान्तांतील भाषण जगांत प्रकट झालें. हा प्रसिद्ध परीक्षितीचा लोकांवर फार मोठा उपकार झाला. ११ राजाची श्रद्धा पाहून त्याच्यावरील प्रेमामुळें शुकाचार्य उतावीळ झाले व त्यांनीं हें गुह्यज्ञान उघड करून त्याची गोडी दाखविली. १२ त्या शुकाचार्यांचें महात्म्य काय वर्णावें! त्यानें हें गुह्यज्ञान कानांत न सांगतां नुसत्या

एथवरी श्रवणाची गोडी। प्रसिद्ध दाविली उघडी। तरी अभाग्यु दांतखिळी पाडी। कानाची निमटली नुघडी मिठी ॥ १४ ॥ श्रवणीं घालितां वाडेंकोडें। कथासारामृत बाहेरी सांडे। श्रवणाआंतौता थेंबही न पडे। यालागीं रडे विषयांसी ॥ १५ ॥ असो हे श्रोत्यांची कथा। कथा सांग जो वक्ता। तोही तैसाचि रिता। घोटु आंतौता पावों नेदी ॥ १६ ॥ जैसा गुळउंसाचा घाणा। रसु बाहेरी जाये मांदणा। फिकेपणें करकरी गहना। ते गती वदना वक्तयाचे ॥ १७ ॥ जें कथामृताचें गोडपण। तें सद्गुरूवीण चाखवी कोण। यालागीं जनार्दना शरण। जेणें गोडपण चाखविलें ॥ १८ ॥ परी चाखविली ऊणखूण। तेही अभिनव आहे जाण। स्वाद स्वादिता आपण। होऊनि गोडपण चाखवी ॥ १९ ॥ बाळकाहातीं दिधल्या फळा। खावें हें न कळे त्या अबळा। त्याचे मुखीं घालूनि गळाळा। गोडीचा जिव्हाळा जनक दावी ॥ २० ॥ गोडी लागल्या बाळकासी। तेंचि फळ खाय अहर्निशीं। तेवीं जनार्दनें आम्हांसी। गोडी श्रीभागवतासी लाविली ॥ २१ ॥ ऐसी लाविली गोडी चढोवडी। तेणें झाली नवलपरवडी। सांडिताही ते गोडी। गोडी न सोडी मजलागीं ॥ २२ ॥ ते गोडीनें गिळिलें मातें। मीपण गेलें गोडीआंतौतें। ते गोडीचें उथळलें भरितें। सबाह्य रितें उरों नेदी ॥ २३ ॥ हें शुकमुखींचें श्रेष्ठ फळ। गोडीपणें अतिरसाळ। त्वचा आंठोळीवीण केवळ। गोडीच सकळ फळरूपें ॥ २४ ॥ ते श्रीभागवतींची गोडी। श्रीकृष्णें निजआवडीं। उद्धवासी कडोविकडी। भक्ती चोखडी चाखविली ॥ २५ ॥ करितां माझें भजन। धरितां माझे मूर्तीचें ध्यान। समाधिपर्यंत साधन। उद्धवासी संपूर्ण सांगीतलें ॥ २६ ॥ ते कृष्णमुखींची मातू। एकोनि चौदाव्या अध्यायांतू। उद्धव हरिखला अद्भुतू। माझा निजस्वार्थु फावला

श्रवणानेंच परीक्षिताचा संसारबंध तोडून टाकून त्याचा उद्धार केला. १३ श्रवणाची गोडी इतकी जरी उघड करून दाखविली, तरी अभागी लोकांची दांतखिळी बसते व कानांत दिलेले दट्टे निघत नाहींत. १४ मोठ्या प्रेमानें त्यांच्या कानांत जरी कथासारामृत ओतलें तरी त्यांतील एक थेंबहि आंत न शिरतां तें सगळें बाहेर सांडतें. त्यामुळें तो विषयासाठीं रडत बसतो. १५ असो. ही श्रोत्यांची गोष्ट झाली. कथा सांगणारा जो वक्ता तोहि असाच रिकामा असतो. आपल्या अंतकरणांत तो एक घोटहि उतरूं देत नाहीं. १६ ऊंसाच्या गुऱ्हाळांतील रस पिळून भांड्यांत पडतो आणि निरस चोयटे मात्र त्या घाण्यांत जसे करकर आवाज करीत असतात, तसें वक्त्याचें तोंड कोरडी वटवट करीत असतें. १७ कथामृताची गोडी सद्गुरुवांचून कोण चाखवूं शकणार ! यास्तव ज्यानें ती गोडी चाखविली, त्या जनार्दनास शरण आलों. १८ त्यांनीं जी गोडी चाखविली तीहि किती विलक्षण पहा ! आपणच रस व रस चाखणारा होऊन गोडी चाखविली. १९ लहान बालकाच्या हातांत एखादें फळ दिल्यास त्या बिचाऱ्याला तें कसें खावें हें कळत नाहीं. तेव्हां त्याचा पिता त्याच्या तोंडांत रसाची धार घालून त्याला त्या गोडीची चटक लावितो; २० पण एकदा त्या बाळाला गोडी लागली कीं, मग तें रात्रंदिवस तेंच फळ जसें खाऊं लागतें, त्याप्रमाणें जनार्दनस्वामींनीं आम्हांला श्रीभागवताची गोडी लाविली. २१ त्या गोडीची आम्हांला इतकी चटक लागून राहिली आहे कीं, त्यानें मोठें आश्चर्य घडलें. मीं जरी गोडी सोडून दिली, तरी ती मला सोडीत नाहीं. २२ त्या गोडीनें मला गिळिल्यामुळें तिच्यामध्येंच ‘मी-पणा’चा लोप झाला. त्या गोडीला इतकें भरतें आलें कीं, आंतून बाहेरून वाहून गेल्यामुळें तिनें रिकामी जागाच ठेविली नाहीं. २३ हें भागवतरूपी श्रीशुकाच्या मुखांतील उत्कृष्ट फळ आहे. त्याची गोडी अति रसाळ आहे. साल व बाठे यांनीं रहित असें हें सगळेंच फळ गोड आहे. २४ अशा या श्रीभागवताची गोडी श्रीकृष्णानें मोठ्या आवडीनें सांगोपांग व उत्तम प्रकारें उद्धवाकडून चाखविली. २५ माझें भजन व माझ्या मूर्तीचें ध्यान करीत असतांना क्रमानें प्राप्त होणारें समाधीपर्यंत सर्व साधन उद्धवाला सांगितलें. २६ चवदाव्या अध्यायांत श्रीकृष्णाच्या तोंडचे ते शब्द ऐकून उद्धवाला विलक्षण हर्ष झाला व माझा स्वार्थ साधिला असें त्याला वाटलें. २७ (त्यानें असा

॥ २७ ॥ मज कृष्णमूर्तीचें ध्यान । सहजें सदा असे जाण । तेणेंच होय समाधि समाधान । तरी का प्रश्न करूं आतां ॥ २८ ॥ ऐकोनि चौदावा अध्यावो । झाला उद्धवासी हा दृढ भावो । हें देखोनि स्वयें देवो । पुढील अभिप्रावो सूचितू ॥ २९ ॥ दृढ विश्वासेंसीं जाण । करितां माझें भजन ध्यान । पुढां उपजे सिद्धींचें विघ्न । ते अर्थीं श्रीकृष्ण उपदेशी ॥ ३० ॥ पंधरावे अध्यायीं निरूपण । भक्तीं माझें करितां भजन । अवश्य सिद्धी उपजती जाण । त्या त्यागवी विघ्न म्हणोनी ॥ ३१ ॥

श्रीभ०—जितेन्द्रियस्य युक्तस्य जितश्वासस्य योगिनः । मयि धारयतश्चेत उपतिष्ठन्ति सिद्धयः ॥ १ ॥

प्राणापानजयो जयापाशीं । इंद्रियजयो असे ज्यासी । यावरी उल्हास मद्भक्तीसी । चित्त अहर्निशीं मद्युक्त ॥ ३२ ॥ उद्धवा गा त्याच्या ठायीं । अनिवार सिद्धी उपजती पाहीं । ये अर्थीं संदेह नाहीं । जे जे समयीं जें इच्छी ॥ ३३ ॥ ऐसें उद्धवें ऐकतां । चमत्कारू झाला चित्ता । समूळ सिद्धींची कथा । श्रीकृष्णनाथा पुसों पां ॥ ३४ ॥

उद्धव उवाच—कया धारणया कास्वित् कथं वा सिद्धिरच्युत ।
कति वा सिद्धयो ब्रूहि योगिनां सिद्धिदो भवान् ॥ २ ॥

विचार केला कीं) मला तर सर्वदा श्रीकृष्णाचें ध्यान सहजच घडत असतें व त्यानेंच जर समाधीपर्यंत समाधान मिळत असेल तर मग मी आतां दुसरे प्रश्न तरी कशाला करूं ! २८ चौदावा अध्याय ऐकून उद्धवाच्या मनाचा असा दृढ निश्चय झाला. हें जाणून श्रीकृष्णानें स्वतःच पुढील अभिप्राय सुचविला. २९ दृढ विश्वास ठेवून माझें भजन व ध्यान केलें तरी पुढें सिद्धींचें विघ्न उत्पन्न होतें. म्हणून श्रीकृष्ण स्वतःच उपदेश करितात. ३० भक्तीनें माझें भजन केलें असतां सिद्धि अवश्य उत्पन्न होतात. पण तें विघ्न आहे असें समजून भक्तानें त्याचा त्याग करावा, अशा आशयानें पंधराव्या अध्यायांत श्रीकृष्ण सिद्धीचेंच निरूपण करितात. ३१

[या पंधराव्या अध्यायात विष्णुपदाच्या प्राप्तीचीं विघ्नें म्हणून योग्यांना संमत असलेल्या धारणेनें प्राप्त होणाऱ्या सिद्धि सांगितल्या आहेत.]

——याप्रमाणें मनाच्या एकाग्रतेचा अभ्यास करणाऱ्या योग्याला समाधि प्राप्त होण्याच्यापूर्वीं मध्येंच व्यक्त होणाऱ्या सिद्धिहि प्रायः विघ्नेंच आहेत. म्हणून त्यांचा परिहार करून योग्यानें परमेश्वरपरायणच व्हावें, हें सांगण्यासाठीं भगवान् प्रथम त्या सिद्धिच सांगतात——

श्रीभगवान् उवाच—श्रीभगवान् म्हणाले, जितेन्द्रियस्य युक्तस्य जितश्वासस्य मयि चेतः धारयतः योगिनः—ज्यानें आपल्या इंद्रियांना जिंकिलें आहे, चित्ताला स्थिर केलें आहे, प्राणाला स्वाधीन ठेविलें आहे व चित्ताची धारणा माझ्या ठिकाणीं केली आहे अशा योग्याच्या, सिद्धयः उपतिष्ठन्ति—सिद्धि उपस्थित होतात. [योगाभ्यास करीत असतांना समाधि सिद्ध होण्यापूर्वींच योग्याला पुढें सांगितलेल्या अठरा सिद्धि प्राप्त होतात. १.]

ज्यानें प्राणापानावर जय मिळविला, इंद्रियांचा निग्रह केला, चित्त रात्रंदिवस माझ्यामध्येंच लावून माझ्या भक्तीविषयीं उल्हास ठेविला ३२ त्याला अनिवार सिद्धि प्राप्त होतात, हे उद्धवा ! यांत मुळींच संशय नाहीं. ज्या ज्या वेळीं तो जें इच्छितो तें त्याला साध्य होतें. ३३ उद्धवानें हें ऐकिलें असतां त्याच्या मनाला मोठा चमत्कार वाटला व त्यानें सर्व सिद्धींची कथा श्रीकृष्णाला विचारिली. ३४.

उद्धवः उवाच—उद्धव म्हणाला, अच्युत—हे अच्युता ! कया धारणया कास्वित् कथं वा सिद्धिः—कोणत्या धारणेनें, कोणत्या नांवाची व कशाप्रकारची सिद्धि प्राप्त होते ? सिद्धयः वा कति—व सिद्धि किती आहेत, ब्रूहि—तें मला सांग. (तूंच त्या जाणतोस, दुसरे कोणी नाहीं, अशा आशयानें उद्धव म्हणतो—) कारण, योगिनां सिद्धिदः भवान्—योग्यांचा सिद्धिदाता तूं आहेस. २.

कोण्या धारणा कोण सिद्धी । ते सांगावी विधानविधी । संख्या किती सकळ सिद्धी । तेंही कृपानिधी सांगिजे ॥ ३५ ॥ या सकळ सिद्धींची कथा । तूं एक जाणता तत्त्वतां । ते मज सांगिजे जी अच्युता । तूं सिद्धिदाता योगियां ॥ ३६ ॥

श्रीभ०– सिद्धयोऽष्टादश प्रोक्ता धारणा योगपारगैः । तासामष्टौ मत्प्रधाना दशैव गुणहेतवः ॥ ३ ॥

सिद्धी अष्टादश जाण । त्यांची धारणा भिन्न भिन्न । ऐसें बोलिले योगज्ञ । योगसंपन्न महासिद्ध ॥ ३७ ॥ या नांव गा सिद्धी समस्ता । यांत अष्ट महासिद्धी विख्याता । त्या माझे स्वरूपीं स्वरूपस्थिता । आणिकासी तत्त्वतां त्या नाहीं ॥ ३८ ॥ मनसा वाचा कर्मणा जाण । विसरोनि देहाचें देहपण । माझेनि स्वरूपें अतिसंपन्न । चैतन्यघन जो झाला ॥ ३९ ॥ त्यापाशीं या सिद्धी जाण । उभ्या असती हात जोडून । परी तो न पाहे थुंकोन । निचाड जाण यापरी ॥ ४० ॥ इतर दहा सिद्धींची कथा । ज्या सत्वगुणें गुणभूता । साधक शुद्धसत्वात्मा होता । त्यापाशीं सर्वथा प्रकटती ॥ ४१ ॥ अष्ट महासिद्धींची कथा । तुज मी सांगेन तत्त्वतां । ज्या माझे स्वरूपीं स्वभावतां । असती वर्ततां अहर्निशीं ॥ ४२ ॥

अणिमा महिमा मूर्तेर्लघिमा प्राप्तिरिन्द्रियैः । प्राकाश्यं श्रुतदृष्टेषु शक्तिप्रेरणमीशिता ॥ ४ ॥
गुणेष्वसङ्गो वशिता यत्कामस्तदवस्यति । एता मे सिद्धयः सौम्य अष्टावौत्पत्तिका मताः ॥ ५ ॥

कोणत्या धारणेनें कोणती सिद्धि प्राप्त होते, त्याचें विधान सांगावें आणि हे कृपासागरा ! सगळ्या सिद्धींची संख्या किती आहे, तेंहि सांग. ३५ कारण हे अच्युता ! सगळ्या सिद्धींची कथा जाणणारा खरोखर तूंच एक आहेस. सर्व योग्यांना सिद्धि देणाराहि तूंच आहेस. यास्तव त्या मला सांग. ३६.

श्रीभगवान उवाच-श्रीभगवान म्हणाले, योगपारगैः अष्टादश सिद्धयः धारणा च प्रोक्ताः–योगांमध्यें निष्णात असलेल्या योगवित्तमांनीं अठरा सिद्धि व अठरा धारणा सांगितल्या आहेत. ['योगपारगैः' हें पद त्रिकालज्ञत्वादि क्षुद्र सिद्धींना दुसरेहि जाणतात अशा आशयानें योजिलें आहे.] तासां अष्टौ मत्प्रधानाः–त्यांतील आठ सिद्धि मत्प्रधान आहेत. [म्ह० ज्यांचा स्वभावतः आश्रय मी आहें अशा आहेत. माझ्या सारूप्याला प्राप्त झालेल्या भक्तांमध्यें त्या थोड्याशा न्यून असतात, असा याचा भावार्थ] गुणहेतवः दश एव–आणि सत्त्वगुणाच्या उत्कर्षामुळें प्राप्त होणाऱ्या सिद्धि दहाच आहेत. ३

(श्रीकृष्ण म्हणाले कीं,) एकंदर सिद्धी अठरा आहेत [आठ स्वाभाविक व दहा गौण] व त्यांच्या धारणा भिन्नभिन्न आहेत, असें योगवेत्ते, योगसंपन्न महासिद्ध सांगतात. ३७ या सर्वांस सिद्धि म्हणतात. त्यांत आठ सिद्धि अत्यंत श्रेष्ठ असून प्रसिद्ध आहेत. त्या माझ्या स्वरूपांत स्थिर होणारांसच प्राप्त होतात. इतरांस कधींच लाधत नाहींत. ३८ जो मन, वाणी व कर्म यानीं देहाचें देहपण विसरून माझ्या स्वरूपांत तल्लीन होऊन ज्ञानरूप बनतो, ३९ त्याच्याजवळ या सिद्धि हात जोडून उभ्या रहातात. पण तो त्यांच्याकडे थुंकूनहि पहात नाहीं. इतका तो निस्पृह असतो. ४० बाकीच्या इतर सिद्धि सत्त्वगुणानें युक्त असतात व साधक शुद्धसत्त्वगुणसंपन्न होतांच त्याच्यापाशीं त्या पूर्णपणें प्रकट होतात. ४१ रात्रंदिवस माझ्या स्वरूपांत स्वभावतःच रहाणाऱ्या आठ महासिद्धींची कथा मी आतां तुला तत्त्वतः सांगतों. ४२

—आतां त्या सिद्धींचाच साडेपांच श्लोकांनीं उपदेश करितात—

अणिमा महिमा लघिमा मूर्तेः–अणिमा, महिमा व लघिमा या तीन देहाच्या सिद्धि आहेत. प्राप्तिः इंद्रियैः–प्राप्ति या नांवाची चवथी सिद्धि-सर्व प्राण्यांच्या इंद्रियांशी त्या त्या इंद्रियांच्या अधिष्ठातृदेवतारूपानें संबंध होणें-ही आहे. श्रुतदृष्टेषु प्राकाश्यं–'श्रुत' म्हणजे पारलौकिक व 'दृष्ट' म्हणजे दर्शनाला योग्य पण भूच्छिद्रादि प्रदेशीं गुप्त असलेल्या सर्वहि पदार्थांचें भोगदर्शनसामर्थ्य ही 'प्राकाश्य' नावाची पांचवी सिद्धि आहे, शक्तिप्रेरणं ईशिता–माया व तदंशभूत इतर शक्ति यांना प्रेरणा करणें ही 'ईशिता' या नांवाची सहावी सिद्धि आहे. (ईश्वर मायेला प्रेरणा करितो व इतर सिद्धि मायेच्या अंशाला प्रेरणा करितात. याप्रमाणें ईश्वर व अन्यसिद्धि यांच्या शक्तिप्रेरणेमध्यें फरक आहे.) गुणेषु असङ्गः वशिता–विषयभोगांमध्यें आसक्त न होणें ही 'वशिता' नांवाची सातवी सिद्धि आहे. यत कामः तत अवस्यति–ज्या ज्या सुखाची इच्छा करितो, त्याच्या त्याच्या सीमेला प्राप्त होतो, ही आठवी सिद्धि होय. सौम्य एताः अष्टौ सिद्धयः मे औत्पत्तिकाः मताः–हे प्रिय उद्धवा ! या आठ सिद्धि मला स्वाभाविक व निरतिशय म्हणून मान्य आहेत. ४–५.

अणिमा महिमा लघिमास्थिती । या तिन्ही देहसिद्धीचे प्राप्ती । प्राप्तिरिंद्रियैः जे वदंती । ते जाण चौथी महासिद्धी ॥ ४३ ॥ प्राकाश्य श्रुतदृष्टांता । ते पांचवी सिद्धी गा सर्वथा । शक्तिप्रेरण ईशिता । हे जाण तत्त्वतां सहावी सिद्धी ॥ ४४ ॥ माझे धर्म जेथ वश होती । ते वशिता बोलिजे सिद्धांतीं । ते सातवी सिद्धी वदंती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ४५ ॥ त्रिलोकीं भोग जो निरुपम । तो न करितां परिश्रम । इच्छामात्रें उत्तमोत्तम । भोग सुगम हों लागे ॥ ४६ ॥ इच्छिल्या कामसुखाची प्राप्ती । त्रिभुवनींची भोगसंपत्ती । एकेच काळें अवचितीं । ते जाण पां ख्याती आठवी सिद्धी ॥ ४७ ॥ या अष्टमहासिध्दींची राशी । स्वभावें असे मजपाशीं । साधक शिणतां प्रयासीं । एखादी कोणासी उपतिष्ठे ॥ ४८ ॥ हे महासिद्धींची व्युत्पत्ती । इतर दाह ज्या बोलिजेती । त्याही सांगेन तुजप्रती । यथानिगुतीं उद्धवा ॥ ४९ ॥

अनूर्मिमत्त्वं देहेऽस्मिन्दूरश्रवणदर्शनम् । मनोजवः कामरूपं परकायप्रवेशनम् ॥ ६ ॥
स्वच्छन्दमृत्युर्देवानां सहक्रीडानुदर्शनम् । यथासङ्कल्पसंसिद्धिराज्ञाऽप्रतिहता गतिः ॥ ७ ॥

देही बाधिती ना ऊर्मि साही । ते अनूर्मिसिद्धी पहिली पाहीं । दूरली वाचा ऐके ठायीं । दूरश्रवण नवाई दुसरी सिद्धी ॥ ५० ॥ त्रिलोकींचा सोहळा । बैसले ठायीं देखे डोळां । हे तिसरे सिद्धीची लीला । दूरदर्शन कळा ती नांव ॥ ५१ ॥ मनोजवसिद्धी ऐशी आहे । कल्पिल्या ठायासी पाहे । मनोवेगें शरीर जाये । चौथी होये हे सिद्धी ॥ ५२ ॥ कामरूप सिद्धीची परी । जैशिया रूपाची कामना करी । तैसें रूप तत्कळ धरी । हे पांचवी खरी कामनासिद्धी ॥ ५३ ॥ आपुलें शरीर ठेवूनि

अणिमा, महिमा व लघिमा या तीन देहाच्या सिद्धि आहेत व प्राप्ति या नांवाची चवथी महासिद्धि इंद्रियांची आहे. ४३ परलोकींच्या अदृश्य विषयांचें ज्ञान देणारी प्राकाश्य नांवाची पांचवी सिद्धि होय. शक्तीला प्रेरणा करणारी ईशिता ही सहावी सिद्धि. ४४ माझे धर्म जिच्यायोगें वश होतात, म्हणून सिद्धान्तामध्यें जिला वशिता बोलतात, ती सातवी सिद्धि आहे, असें तूं निश्चित समज. ४५ हे उद्धवा ! त्रिभुवनांतील जे उत्तम भोग ते कांहीं परिश्रम न करितां केवल इच्छा होतांच प्राप्त होतात. ४६ याप्रमाणें इच्छिलेल्या सुखाची प्राप्ति करून देणारी व त्रिभुवनांतील भोगसंपत्ति एकाच वेळीं अकस्मात् देणारी ख्याती नांवाची आठवी सिद्धि जाणावी. ४७ या अष्ट-महासिद्धींच्या राशी माझ्यापाशीं स्वभावतःच आहेत. साधक मोठे प्रयास करून थकले, म्हणजे त्यांतील एखादी त्याला साध्य होते. ४८ या महासिद्धींची व्युत्पत्ति व इतर ज्या गौण आहेत त्यांचेहि प्रकार, हे उद्धवा ! मी तुला क्रमानें योग्य रीतीनें सांगतों. ४९.

—आतां राहिलेल्या गुणहेतुसिद्धि सांगतात—

अस्मिन् देहे अनूर्मिमत्त्वं–या देहांत क्षुधा, तृषा इत्यादिकांचें राहित्य, दूरश्रवणदर्शनं–दूरप्रदेशांतील शब्दाचें श्रवण व वस्तूंचें दर्शन, मनोजवः–मनोवेगानें देहाची गति, कामरूपं–इष्ट स्वरूपांची प्राप्ति, परकायाप्रवेशनं–दुसऱ्याच्या देहांत प्रवेश करणें, स्वच्छन्दमृत्युः–भीष्माप्रमाणें स्वेच्छामरण, देवानां (अप्सरोभिः सह) क्रीडानुदर्शनं–देवांच्या अप्सरा-सह होणाऱ्या क्रीडांचें प्रत्यक्ष दर्शन, यथासंकल्पसंसिद्धिः–संकल्पाच्या अनुसार वस्तूची प्राप्ति होणें व, अप्रतिहता गतिः आज्ञा–आज्ञेची गति कोठेंहि कुंठित न होणें. [अशा या दहा गुणहेतुसिद्धि आहेत.] ६-७.

क्षुधा-तृषा, शोक-मोह, जरा-मृत्यु या सहा ऊर्मी देहाला बाधत नाहींत, ही पहिली अनूर्मिसिद्धि होय. बसल्या जागेवरूनच दूरचें भाषण ऐकतां येणें ही ‘ दूर श्रवण ’-नांवाची दुसरी अद्‌भुत सिद्धि. ५० त्रिभुवनांतील सर्व सोहळा बसल्या जागीं दृष्टीस पडतो, ती ‘ दूरदर्शन कळा-’ नांवाची तिसरी सिद्धि. ५१ मनोजवसिद्धि अशी आहे कीं, मनांत कल्पना केल्याबरोबर त्या ठिकाणीं मनाच्या वेगानें शरीर जातें. ही चवथी सिद्धि होय. ५२ कामरूप-सिद्धीचा प्रकार असा आहे कीं, जशा रूपाची मनांत इच्छा करावी, तें रूप तत्काल धारण करितां येतें, ही पांचवी कामनासिद्धी होय. ५३ आपलें शरीर दूर ठेवून दुसऱ्याच्या देहांत प्रवेश करितां येणें ही परकायाप्रवेशरूप

दूरी । परशरीरीं प्रवेश करी । हे परकायप्रवेशपरी । सहावी साजिरी अतिसिद्धी ॥ ५४ ॥ काळासी वश्य नाहीं होणें । आपुलिये इच्छेनें मरणें । हे सातवी सिद्धी जाणणें । स्वछंदमरणें ती नांव ॥ ५५ ॥ स्वर्गीं देवांचें जें क्रीडन । त्याचें हा देखे दर्शन । स्वयें क्रीडावया अंगवण । ते सिद्धीजाण आठवी ॥ ५६ ॥ जैसा संकल्प तैसी सिद्धी । ते नववी जाण पां त्रिशुद्धी । राजाही आज्ञा शिरी वंदी । ज्याची गमनासिद्धी सर्वत्र ॥ ५७ ॥ ज्याची आज्ञा आणि गमन । कोठेंही अवरोधेना जाण । हें दहावे सिद्धीचे लक्षण । ज्ञानविचक्षण जाणती ॥ ५८ ॥ या गुणहेतुसिद्धीची विधि । म्यां सांगितली हे त्रिशुद्धी । यांहीहोनि क्षुद्रसिद्धी । त्याही निजबुद्धी अवधारी ॥ ५९ ॥

त्रिकालज्ञत्वमद्वंद्वं परचित्ताद्यभिज्ञता । अग्न्यर्काम्बुविषादीनां प्रतिष्टम्भोऽपराजयः ॥ ८ ॥

क्षुद्रसिद्धी पंचलक्षण । भूत भविष्य वर्तमान । या त्रिकाळांचें जें ज्ञान । तें पहिलें जाण ये ठायीं ॥ ६० ॥ सुख दुःख शीत उष्ण । मृदु आणि अतिकठिण । या द्वंद्वांसी वश नव्हे जाण । तें दुसरें लक्षण सिद्धीचें ॥ ६१ ॥ पराचें स्वप्न स्वयें सांगणें । पुढिलाचे चित्तींचें जाणणें । हे तिसरी सिद्धी म्हणणें । ऐक लक्षणें चौथीचीं ॥ ६२ ॥ अग्नि वायु आणि उदक । शस्त्र विष आणि अर्क । यांचें प्रतिस्तंभन देख । ते सिद्धी निष्टंक पैं चौथी ॥ ६३ ॥ कोणासी जिंकिला न वचे पाहें । जेथींच्या तेथ विजयी होये । एकला सर्वत्र विजयो लाहे । हे पांचवी आहे विजयसिद्धी ॥ ६४ ॥

एताश्चोद्देशतः प्रोक्ता योगधारणसिद्धयः । यथा धारणया या स्याद्यथा वा स्यान्निबोध मे ॥ ९ ॥

सहावी उत्तम अतिसिद्धि आहे. ५४ काळाला वश न होतां आपल्या इच्छेप्रमाणें मरणें ही सातवी सिद्धि. तिला 'स्वच्छंदमरण' असें नांव आहे. ५५ स्वर्गांत देव क्रीडा करितात, ती दृष्टीस पडणें व तशा क्रीडेचें सामर्थ्य अंगीं येणें ही आठवी सिद्धी. ५६ जसा संकल्प करावा, तशी सिद्धी प्राप्त होणें ही नववी सिद्धि जाण. त्या योग्याची आज्ञा राजाहि शिरसा वंद्य करितो. त्याला सर्वत्र संचार करितां येतो. ५७ त्याची आज्ञा व गति यांस कोठेंहि प्रतिबंध होत नाहीं, हें दहाव्या सिद्धीचें लक्षण ज्ञानी विद्वान् जाणतात. ५८ हे उद्धवा ! या गुण-हेतु सिद्धींचा विधि मीं तुला सांगितला. आतां याहून वेगळ्या ज्या पांच क्षुद्रसिद्धि, त्याहि लक्षपूर्वक ऐक. ५९.

—आतां पांच क्षुद्रसिद्धि सांगतात—

त्रिकालज्ञत्वं–भूत, भविष्यत् वर्तमान या तीन्ही कालांचें ज्ञान, अद्वंद्व–शीतोष्णादिकांनीं पराभूत न होणें, परचित्ताद्यभिता–दुसऱ्याचें मनोगत वगैरे जाणणें, अग्न्यर्काम्बुविषादीनां प्रतिष्टम्भः–अग्नि, सूर्य, जल, विष इत्यादि पदार्थांचें स्तंभन व, अपराजयः–पराभव न पावणें, अशा पांच क्षुद्र सिद्धि आहेत. ८.

क्षुद्रसिद्धि पांच प्रकारच्या आहेत. भूत, भविष्य व वर्तमान या तीन काळांचें ज्ञान होणें हें पहिलें लक्षण जाण. ६० सुख-दुःख, शीत-उष्ण, मृदु-कठोर या द्वंद्वांच्या अधीन न होणें हें दुसरें लक्षण; ६१ दुसऱ्याचें स्वप्न सांगतां येणें इतरांच्या मनांतील गोष्ट ओळखतां येणें, हें तिसरें लक्षण आहे. आतां चौथ्या सिद्धीचें लक्षण ऐक. ६२ अग्नि, वायु, जल, शस्त्र, विष व सूर्य यांचा प्रभाव चालूं न देणें ही चौथी सिद्धि निश्चयानें जाण. ६३ कोणाकडूनहि जिंकिलें न जातां, सर्वांवर जय मिळवितां येऊन सर्व ठिकाणीं एकट्यालाच विजयी होतां येणें ही पांचवी विजयसिद्धि होय. ६४.

एताः योगधारणसिद्धयः उद्देशतः प्रोक्ताः–या योगधारणेनें प्राप्त होणाऱ्या सिद्धि केवळ नामतः सांगितल्या (म्ह० क्रमानें केवल त्यांच्या नांवाचा उल्लेख केला. आतां प्रत्येक सिद्धीच्या भिन्न भिन्न धारणेसह या अध्यायाच्या समाप्तीपर्यंत विशेषतः निरूपण करितात–) यया धारणया या स्यात् यथा वा स्यात् तत् मे निबोध–ज्या धारणेनें जी सिद्धि प्राप्त होते किंवा ज्या प्रकारें ती प्राप्त होते, तें मजपासून ऐक. ९.

उद्देशमात्रे सिद्धींची गती । म्यां सांगीतली तुजप्रती । आतां कोण धारणा कोण स्थिती । सिद्धीची प्राप्ती होत ते ऐक ।। ६५ ।। अष्ट महासिद्धिची धारणा । गुणहेतु दहा सिद्धी जाणा । क्षुद्रसिद्धी पंचलक्षणा । त्यांचे साधिल्या साधना हरि बोले ।। ६६ ।।

भूतसूक्ष्मात्मनि मयि तन्मात्रं धारयेन्मनः । अणिमानमवाप्नोति तन्मात्रोपासको मम ।। १० ।।

अष्ट महासिद्धी स्वाभाविका । माझ्या ठायीं असती देखा । या असाध्य साधावया आवांका । करित्या साधका साधन सांगे ।। ६७ ।। मी अणुरेणूचाही अणुरेण । जीवाचाही हृदयस्थ जाण । तेथ अणुतन्मात्र करूनि मन । माझ्या ठायीं जाण जो राखे ।। ६८ ।। अणुतन्मात्र ध्यान सदा राहे । त्याचा अणुमात्रचि देहं होये । कीटकीभृंगीच्या ऐसें पाहें । अणिमेची लाहे तो सिद्धी ।। ६९ ।। तो अच्छिद्रीं निघोनि जाये । जगाच्या डोळ्यामाजीं समाये । कोठेंही खुपेना पाहें । हे अणिमेची लाहे महासिद्धी ।। ७० ।।

महत्यात्मन्मयि परे यथासंस्थं मनो दधत् । महिमानमवाप्नोति भूतानां च पृथक्पृथक् ।। ११ ।।

माझे स्वरूप अनंत अपार । महत्तत्त्वाहोनि अतिथोर । आणि महत्तत्त्वाचाही साचार । नियंता ईश्वर जो कां मी ।। ७१ ।। ते सिद्धी साधावया जो नर । माझी धारणा धरी अपरंपार । तेवढेच होय त्याचे शरीर । हे सिद्धी महाथोर महिमान ।। ७२ ।। सूक्ष्म कापुसाचे तंतू पाहें । तो कल्पनेऐसा पट्ट होये । माझी महती धारणा वाहे । तो माझी सिद्धी लाहे महिमत्वें ।। ७३ ।। तुकितां त्याच्या समान भारा । न पुरे सपर्वत सगळी धरा । एवढ्या महत्तत्त्वांचा उभारा । सिद्धिद्वारा तो पावे ।। ७४ ।।

सिद्धीचें स्वरूप मीं तुला थोडक्यांत सांगितलें. आतां कोणत्या धारणेनें कोणती सिद्धि प्राप्त होते, तें ऐक. ६५ धारणारूप अष्ट महासिद्धि, दहा गौण सिद्धि व पांच क्षुद्र सिद्धि, या सिद्धि साधून देणारीं साधनें आतां श्रीकृष्ण सांगत आहे. ६६.

भूतसूक्ष्मात्मनि मयि तन्मात्रं मनः धारयेत्—सूक्ष्मभूतें ही ज्याची उपाधि आहे, अशा माझ्या ठिकाणीं भूतसूक्ष्माकार मनाचें स्थैर्य संपादन करावें. तन्मात्रोपासकः मम अणिमानं अवाप्नोति—त्या तन्मात्रोपासकाला माझें अणुत्व प्राप्त होतें. १०.

अष्टसिद्धि स्वभावतःच माझ्या ठिकाणीं आहेत. या असाध्य सिद्धिहि साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या साधकाला मी साधन सांगतों. ६७ मी अणुरेणूहूनहि सूक्ष्म जीवांचाहि हृदयस्थ आहें. त्या मजमध्यें योगी आपलें मन अणुमात्र करून ठेवितो. ६८ ज्याचें ध्येय अणूसारखें सूक्ष्म असतें, त्याचा देहहि तेवढा होतो. कारण किटक-भृंगन्यायानें माझा देह अणुमात्र आहे, अशा सतत चिंतनानें त्याच्या देहाला अणिमा सिद्धि प्राप्त होते. ६९ तो घन-भरीव पदार्थांतूनहि जाऊं शकतो; लोकांच्या डोळ्यांतहि प्रवेश करितो; पण कोठेंहि खुपत नाहीं. अशी ही अणिमेची महासिद्धि त्याला प्राप्त होते. ७०.

महति परे आत्मन् मयि यथासंस्थं मनः दधत्—ज्ञानशक्तिरूप अशा ‘ महत्तत्त्व ’ या उपाधीनें युक्त असलेल्या माझ्या ठिकाणीं महत्तत्त्वाकार मनाला स्थिर करणारा भूतानां च—आणि आकाशादि भूतें याच उपाधीनें युक्त असलेल्या मज परमात्म्यामध्यें मन स्थिर करणारा योगी, पृथक् पृथक् महिमानं अवाप्नोति—प्रत्येक भूताच्या भिन्न भिन्न महिम्याला प्राप्त होतो. ११.

माझें स्वरूप अनंत, अपार आहे. महत्तत्त्वाहूनहि प्रचंड आणि महत्तत्त्वाचाहि नियंता ईश्वर मीच आहे. ७१ ती सिद्धि साध्य करण्यासाठीं जो पुरुष माझी अपरंपार धारणा धरितो, त्याचें शरीर तेवढेंच होतें. ही महिमा नांवाची सिद्धि फार मोठी आहे. ७२ सूक्ष्म कापसाचेंच तंतु पहा. त्याचें आपल्या कल्पनेप्रमाणें वस्त्र बनतें. मी ईश्वराएवढा मोठा आहें असें जो सतत चिंतन करितो, तो माझ्या महत्तत्त्वाला प्राप्त होतो. ७३ त्याची तुलना करूं गेल्यास पर्वतासह सगळी पृथ्वीहि त्याच्या भारंभार भरणार नाहीं, एवढा मोठा महत्तत्त्वाचा उभारा तो सिद्धिद्वारां मिळवितो. ७४.

परमाणुमये चित्तं भूतानां मयि रञ्जयन् । कालसूक्ष्मार्थतां योगी लघिमानमवाप्नुयात् ॥ १२ ॥

वाय्वादि प्राणप्रमाण । जेणें काळसूत्राचें गणन । तो परमाणुरूप भगवंत जाण । त्याचेंचि दृढ ध्यान सदा जो करी ॥ ७५ ॥ परमाणुधारणेचा महिमा । त्याच्या देहासी ये अतिलघिमा । तो मशकी चढोनि पाहे मा । उडे व्योमामाजी सुखें ॥ ७६ ॥ अणिमादि तीनी धारणा । या देहींच्या सिद्धी जाणा । लहान थोर हळूपणा । देहलक्षणां उपजवी ॥ ७७ ॥ उरल्या त्या पंचमहासिद्धी । त्यांच्या धारणेचा विधी । तोही सांगेन त्रिशुद्धी । ऐक सुबुद्धी उद्धवा ॥ ७८ ॥

धारयन्मय्यहंतत्त्वे मनो वैकारिकेऽखिलम् । सर्वेन्द्रियाणामात्मत्वं प्राप्तिं प्राप्नोति मन्मनाः ॥ १३ ॥

मूळींचा शुद्ध अहंकारू । ज्यापासूनि इंद्रियविकारू । इंद्रियअधिष्ठात्री सुरवरू । चेतविता ईश्वरू जो कां त्या ॥ ७९ ॥ मी माझ्या ठायीं धारणा धरितां । इंद्रियअधिष्ठात्री देवता । त्यांसी पावोनि एकात्मता । इंद्रियप्रकाशता स्वयें लाहे ॥ ८० ॥ जे कां इंद्रियव्यापार जगाचे । प्रकाशूनि हा देखे साचे । एवढिये इंद्रियप्राप्तीचें । साधी सिद्धीचें वैभव ॥ ८१ ॥ तेव्हां ज्याचा जो जेथ पाहे । इंद्रियांचा व्यापारू होये । तो येणेंचि केला आहे । ऐशी प्रतीती होये इंद्रियप्राप्ती ॥ ८२ ॥

महत्यात्मनि यत्सूत्रे धारयन्मयि मानसम् । प्राकाश्यं पारमेष्ठ्यं मे विन्दतेऽव्यक्तजन्मनः ॥ १४ ॥

भूतानां परमाणुमये मयि चित्तं रञ्जयन् योगी–वाय्वादि भूतांचे परमाणु हीच ज्याची उपाधि आहे, अशा माझ्या ठिकाणीं चित्ताला आसक्त करणारा योगी, **लघिमानं कालसूक्ष्मार्थतां अवाप्नुयात्**–लघुत्वाला म्हणजे कालाच्या परमाणु-उपाधिरूपतेला प्राप्त होतो. १२.

ज्याच्या योगानें काळसूत्राची गणना होते. व वाय्वादिकांचें प्राण हें ज्याचें प्रमाण आहे, त्या परमाणु-रूप भगवानाचे जो सतत दृढ ध्यान करितो, ७५ त्याच्या देहाला अत्यंत हलकेपणा येतो. असा परमाणु-धारणेचा महिमा आहे. तो मग डांसाच्या पाठीवर चढून आकाशांतून आनंदानें संचार करितो. ७६ अणिमादि तीन्ही धारणा या देहाच्या सिद्धि आहेत. त्या सूक्ष्म-स्थूल, हलकें-जड इत्यादि देहलक्षण उत्पन्न करितात. ७७ आतां पांच महासिद्धि बाकी राहिल्या आहेत. त्यांच्या धारणेचा खरा विधि सांगतों, तो हे बुद्धिमान् उद्धवा ! ऐक. ७८.

वैकारिके अहंतत्त्वे मयि अखिलं मनः धारयन् मन्मनाः (योगी)-सात्विक अहंकार हीच ज्याची उपाधि आहे अशा माझ्या ठिकाणीं एकाग्र मनाचें धारण करणारा अर्थात् माझ्याच ठिकाणीं ज्याचें मन आहे असा योगी, **सर्वेन्द्रि-याणां आत्मत्वं प्राप्तिं प्राप्नोति**–सर्व इंद्रियांच्या अधिष्ठातृत्वाला म्ह० ‘ प्राप्ति ’ या सिद्धीला प्राप्त होतो. [या श्लोकांतील ‘ मन्मनाः ’ या पदानें या सिद्धींच्या प्राप्तीचें कारण सांगितलें आहे. माझ्या ठिकाणीं मनाची जी धारणा, तिच्या प्रभावानेंच या सर्व सिद्धि प्राप्त होतात. त्याविषयीं दुसरा एखादा हेतु असेल असें मनांतहि आणावयास नको. पुढेंहि इतर सिद्धींना हाच न्याय लागू आहे.] १३.

मूळच्या शुद्ध अहंकारापासून इंद्रियांचे विकार उद्भवतात. इंद्रियांचा आधार, त्यांना चेतना देणारा देवाधिदेव जो ईश्वर तो मीच आहें. ७९ त्या माझें ध्यान केलें असतां इंद्रियाच्या अधिष्ठातृ देवतेशीं तादात्म्य पावून स्वतःलाच इंद्रियप्रकाशत्व लाधतें. ८० त्यामुळें जगांतील इंद्रियांचे जेवढे व्यापार चालतात तेवढे सर्व तो स्वतः प्रकट होऊन पहातो. इंद्रियप्राप्तीची सिद्धि झाली असतां त्याला एवढें वैभव प्राप्त होतें. ८१ तेव्हां जेथें जेथें त्याच्या इंद्रियांचा व्यापार होतो, तेथें तेथें तो व्यापार हाच करीत आहे, अशी त्याला या इंद्रिय-प्राप्तिसिद्धीमुळें प्रतीति येते. ८२.

यः महति आत्मनि सूत्रे मयि मानसं धारयेत्–क्रियाशक्तिप्रधान महत्तत्व हेंच सूत्र, तीच ज्याची उपाधि आहे, अशा माझ्या ठिकाणीं जो योगी आपलें मन धारण करितो, सः अव्यक्तजन्मनः **मे पारमेष्ठ्यं प्राकाश्यं विन्दते**–तो अव्यक्तापासून ज्याची उत्पत्ति आहे, अशा सूत्ररूप उपाधीनें युक्त असलेल्या माझ्या सर्वोत्कृष्ट प्राकाश्याला प्राप्त होतो. १४.

जे महत्तत्त्व गा जाण । तें मायेचें प्रथम स्फुरण । ज्यासी क्रिया सूत्रप्रधान । नामाभिधान बोलती ॥ ८३ ॥ तेथ अजन्मा मी आपण । जाहलों सूत्राचा सूत्रात्मा जाण । त्या माझ्या स्वरूपाचें ध्यान । सावधान जो करी ॥ ८४ ॥ ज्या सूत्राचेनि प्रकाशप्रवाहें । ब्रह्मांड हिरण्यगर्भ प्रकाशला राहे । ते प्रकाशता त्यासी वश्य होये । येणें सूत्रात्मा पाहे निदिध्यासनें ॥ ८५ ॥ त्या निदिध्यासनापोटीं । करूं शके ब्रह्मांडकोटी । एवढी प्रकाशसिद्धी गोमटी । हे मजवीण नुठी साधकां ॥ ८६ ॥

विष्णौ त्र्यधीश्वरे चित्तं धारयेत्कालविग्रहे । स ईशित्वमवाप्नोति क्षेत्रक्षेत्रज्ञचोदनाम् ॥ १५ ॥

मायादित्रिगुणनियंता । जो कळिकाळातें आकळिता । उत्पत्तिस्थितिप्रळयकर्ता । जाण तत्त्वतां अंतर्यामी ॥ ८७ ॥ त्या मज विष्णूचें ध्यान । निरंतर जो करी जाण । त्यासी अदृष्टद्रष्टेपण । शक्तिप्रेरण ईशित्वें ये ॥ ८८ ॥ मिथ्या बुद्धिबळाच्या खेळाप्रती स्वाराची जाणें गतोनिगुती । तेवीं मिथ्या संसारप्रतीती । भूतांची आगती निर्गती स्वयें जाणे ॥ ८९ ॥ तो जीवादि शरीरप्रेरण । स्वयें करूं शके आपण । करितां अंतर्याम्याचें ध्यान । एवढी सिद्धी जाण उपतिष्ठे ॥ ९० ॥ तो आपुलेनि प्रतापस्वभावीं । मशकाहातीं मेरू विभांडवी । नीचहस्तें सृष्टी विध्वंसूनि मांडवी । कां इंद्रातें मारवी उंदिराहातीं ॥ ९१ ॥ यापरी एकातें मारवी । जीवें गेलिया जीववी । अचेतनातें पालेजवी । ये सिद्धीची पदवी ईशित्व ॥ ९२ ॥

नारायणे तुरीयाख्ये भगवच्छब्दशब्दिते । मनो मय्यादधद्योगी मद्धर्मा वशितामियात् ॥ १६ ॥

ज्याला महत्तत्त्व म्हणतात, तेंच मायेचें पहिलें स्फुरण आहे. त्यालाच 'सूत्रप्रधान क्रिया' असें नांव आहे. ८३ त्यांत मी स्वतः जन्मरहित असूनहि सूत्राचा सूत्रात्मा झालों आहें. त्या माझ्या स्वरूपाचें तो सावधान चित्तानें ध्यान करितो. ८४ त्याला ज्या सूत्राच्या प्रकाशप्रवाहानें हिरण्यगर्भ ब्रह्मांडाला प्रकाशित करून रहातो, ती प्रकाशता 'सूत्रात्माच मी आहें' असें चिंतन करणाऱ्या त्या योग्याला प्राप्त होते. ८५ त्या निदिध्यासांतच तो कोट्यवधि ब्रह्मांडें निर्माण करितो. इतकी ही प्रकाशसिद्धि जरी उत्तम आहे, तरी ती मजवांचून साधकाला प्राप्त होत नाहीं. ८६.

त्र्यधीश्वरे कालविग्रहे विष्णौ यः चित्तं धारयेत्–त्रिगुणात्मक मायेचा नियंता व त्यामुळेंच कालरूपी अंतर्यामी अशा मज विष्णूमध्यें जो चित्ताचें धारण करितो, सः क्षेत्रक्षेत्रज्ञचोदनां ईशित्वं अवाप्नोति–तो क्षेत्रज्ञ जीव व क्षेत्र म्ह० शरीरेंद्रियादिक, त्याच्या उपाधि यांच्या प्रेरणेला अर्थात् 'ईशित्व' या सिद्धीला प्राप्त होतो. [जगाच्या उत्पत्ति-स्थिति-लयाचें कर्तृत्व त्याला प्राप्त होत नाहीं, केवल क्षेत्र-क्षेत्रज्ञांचें प्रेरकत्व प्राप्त होतें, असा याचा भावार्थ.] १५

मायादि त्रिगुणांचा नियंता, कळिकाळाला बांधणारा, उत्पत्ति-स्थिति-प्रलयकर्ता, तत्त्वतः अंतर्यामी, ८७ अशा मज विष्णूचें जो निरंतर ध्यान करितो, त्याला अदृश्य वस्तु पहाण्याचें सामर्थ्य ईशित्वामुळें प्राप्त होतें. ८८ बुद्धिबळांचा डाव वास्तविक काल्पनिकच असतो; परंतु खेळतेवेळीं त्यांत मोहऱ्यांची योग्य गति जशी समजावी लागते, त्याप्रमाणें संसार मिथ्या असल्याचा अनुभव व जीवाचें जाणें, येणें तो जाणितो. ८९ तो जीवापासून शरीरापर्यंत सर्वांना स्वतः प्रेरणा करितो. अंतर्यामीचें ध्यान केलें असतां एवढी सिद्धि प्राप्त होते. ९० तो आपल्या प्रभावसामर्थ्यानें माशीकडूनहि पर्वताचें विदारण करवितो. सामान्य हलक्या माणसाकडूनहि सृष्टीचा नाश करून पुनः तिची रचना करवूं शकतो. तो इंद्राला उंदिराच्या हातून मारवितो. ९१ याप्रमाणें तो एखाद्याचा प्राण घेतो. मृताला जिवंत करितो, जडाला सचेतन करितो. ईशित्व सिद्धीची एवढी योग्यता आहे. ९२.

तुरीयाख्ये भगवच्छब्दशब्दिते नारायणे मयि मनः दधत् मद्धर्मा योगी वशितां इयात्–विराट्, हिरण्यगर्भ व कारण या तीन उपाधींनीं रहित असलेल्या, तुरीयसंज्ञक व भगवच्छब्दवाच्य अशा मज नारायणामध्यें मनाचें धारण करणारा व त्यामुळेंच माझ्या षड्ऐश्वर्यानें युक्त झालेला योगी वशित्वाला प्राप्त होतो. [समग्र ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान व वैराग्य यांना 'भग' अशी संज्ञा अशा भगानें जो युक्त असतो, तो भगवान्.] १६.

जीव शिव आणि प्रकृती । यांहूनि परती चौथी स्थिती । ज्यातें नारायण म्हणती । जाण निश्चितीं सज्ञान ॥ ९३ ॥ जागृती स्वप्न सुषुप्ती । यांवेगळी तुरीय स्थिती । त्यातें नारायण म्हणती । यथानिगुतीं सज्ञान ॥ ९४ ॥ दृश्य द्रष्टा दर्शन । यांअतीत चौथा जाण । त्यातें म्हणती नारायण । ज्ञानविचक्षण निजबोधें ॥ ९५ ॥ त्रिपुटीवेगळी जे मातू । असोनियां त्रिपुटी आंतू । जो का त्रिपुटीसी अलिप्तू । तो मी विख्यातू नारायण ॥ ९७ ॥ यश श्री वैराग्य ज्ञान । ऐश्वर्य औदार्य हे षड्गुण । नित्य वसती परिपूर्ण । तो मी नारायण भगवंत ॥ ९७ ॥ त्या मज नारायणातें ध्यातां । माझी वशिता सिद्धी ये हाता । सर्व कर्मीं अलिप्तता । भोगूनि अभोक्ता भोगातें ॥ ९८ ॥

निर्गुणे ब्रह्मणि मयि धारयन् विशदं मनः । परमानन्दमाप्नोति यत्र कामोऽवसीयते ॥ १७ ॥

चित्तदेवता सत्वगुण । इंद्रियें तो रजोगुण । विषय केवळ तमोगुण । हेंचि आवरण परमानंदा ॥ ९९ ॥ परमानन्दासी आवरण । आडवे असती तिन्ही गुण । त्यातें सांडूनि निर्गुण । ब्रह्म परिपूर्ण मज जो ध्याये ॥ १०० ॥ त्यासी माझिये ध्यानस्थितीं । होय परमानन्दअवाप्ती । ज्या आनंदामाजीं उपशांती । होय निश्चितीं सकळ कामा ॥ १ ॥ झालिया परमानन्दप्राप्ती । सकळ काम निमग्न होती । जेवीं सूर्योदयाप्रती । तारा हारपती सचंद्र ॥ २ ॥ तेवीं परमानन्दाच्या पोटीं । हारपती कामकोटी । तेथ इंद्रियसुखाच्या गोठी । लाजोनि उठाउठी विरताती ॥ ३ ॥ उद्धवा ऐक पां निश्चितीं । नव्हतां परमानंद-प्राप्ती । कदा नव्हे कामनिवृत्ती । नाना युक्ती करितांही ॥ ४ ॥ या अष्ट महासिद्धींच्या धारणा । तुज म्यां सांगीतल्या जाणा । यांसी साधावया आंगवणा । सुरनरगणां पैं नाहीं ॥ ५ ॥ यापरी अष्ट महासिद्धी । तुज म्यां सांगीतली धारणविधी । आतां गुणहेतुकाचे प्रबोधीं । सावधबुद्धी अवधारीं ॥ ६ ॥

जीव, शिव आणि प्रकृति यांच्या पलीकडे चौथी स्थिति आहे. तिला विद्वान् लोक 'नारायण' असें म्हणतात. ९३ त्याचप्रमाणें जागृति-स्वप्न-सुषुप्ति यांहून वेगळी जी तुरीय अवस्था तिलाहि ज्ञानी 'नारायण' म्हणतात. ९४ तसेंच दृश्य-द्रष्टा-दर्शन यांच्या पलीकडचा जो चौथा साक्षी त्यालाहि स्वानुभवानें ज्ञाते पंडित 'नारायण' असेंच म्हणतात. ९५ त्रिपुटींत असूनहि त्रिपुटीहून भिन्न असलेला जो प्रसिद्ध नारायण तो मीच आहें. ९६ जेथें यश, श्री, वैराग्य, ज्ञान, ऐश्वर्य आणि औदार्य हे सहा गुण नित्य पूर्णपणें वास करितात, तो भगवान् नारायण मीच आहें. ९७ अशा मज नारायणाचें ध्यान केलें असतां माझी 'वशता' नांवाची सिद्धि प्राप्त होते व तो सर्व कर्मांत असून अलिप्त रहातो आणि सर्व भोग भोगून अभोक्ता होतो. ९८.

निर्गुणे ब्रह्मणि मयि विशदं मनः धारयन्—निर्गुण ब्रह्मरूप मजमध्यें शुद्ध मनाला धारण करणारा योगी, यत्र कामः-अवसीयते (तं) परमानंदं आप्नोति—ज्या परमानंदरूपामध्यें तदंशभूत सर्व विषयसुखें अंतर्भूत होतात, त्या परमानंदाला प्राप्त होतो. १७.

चित्तदेवता हा सत्त्वगुण, इंद्रियें हा रजोगुण व विषय हा तमोगुण आहे हेंच परमानंदाचें आवरण आहे. ९९ परमानंदावर आवरण घालणारे हे तीन गुण आडवे येतात. माझें ध्यान करणारा त्यांना बाजूला सारून मज परिपूर्ण निर्गुण ब्रह्माला येऊन पोंचतो. १०० त्यास माझ्या ध्यानामध्यें परमानंदाची प्राप्ति होते. आणि त्या आनंदामध्यें त्याच्या सर्व इच्छा लय पावतात. १ सूर्योदय होतांच चंद्रासह सर्व नक्षत्रें जशीं लोपतात, २ तशा परमानंदामध्यें कोट्यवधि इच्छा लुप्त होतात. तेव्हां इंद्रियसुखाच्या गोष्टी तर लाजून जागच्या-जागीं विरून जातात. ३ बाबा उद्धवा! ऐक. परमानंदाची प्राप्ति झाल्यावांचून अनेक उपाय योजिले तरी कामनिवृत्ति कदापिहि होत नाहीं ४ उद्धवा या अष्टमहासिद्धींच्या धारणा मीं तुला सांगितल्या. ज्या सिद्ध करण्याचें सामर्थ्य मनुष्यांस किंवा देवादिकांसहि नाहीं, ५ अशा या अष्टमहासिद्धींचा धारणाविधि मीं तुला सांगितला. आतां गुणहेतूंच्या सिद्धींचीं साधनें लक्षपूर्वक ऐक. १०६.

श्वेतद्वीपपतौ चित्तं शुद्धधर्ममये मयि । धारयन् श्वेततां याति षडूर्मिरहितो नरः ॥ १८ ॥

सांडूनि कार्येंसीं रजतमें दूरी । जो मी सत्वाधिष्ठाता श्रीहरी । त्या माझी जो धारणा धरी । अखंडाकारी सर्वदा ॥ ७ ॥ तो माझेनि सत्वें सत्वतंतू । होय षडूर्मींसीं रहितू । शोक मोह जरा मृत्यू । क्षुधा तृषा हातू लावूं न शके ॥ ८ ॥

मय्याकाशात्मनि प्राणे मनसा घोषमुद्वहन् । तत्रोपलब्धा भूतानां हंसो वाचः शृणोत्यसौ ॥ १९ ॥

सघोष प्राणेंसीं शब्दमहिमा । अवश्य विश्रांतीस ये व्योमा । त्या आकाशाचाही मी आत्मा । मजमाजीं व्योमा रहिवासू ॥ ९ ॥ तो मी सघोष प्राणांचाही प्राण । सकळ वाचांची वाचा जाण । वागीश्वरीचें जीवन । सत्य मी जाण उद्धवा ॥ ११० ॥ ऐसिया माझें दृढ ध्यान । निजहृदयीं जो करी जाण । तो विचित्रां वाचांचें श्रवण । जीवस्वरूपें जाण स्वयें ऐकें ॥ ११ ॥ सनाद माझी धारणा पोटीं । धरितां जगाच्या गुह्य गोष्टी । त्याचे पडती कर्णपुटीं । ते काळीं उठी दूरश्रवणसिद्धी ॥ १२ ॥

चक्षुस्त्वष्टरि संयोज्य त्वष्टारमपि चक्षुषि । मां तत्र मनसा ध्यायन् विश्वं पश्यति सूक्ष्मदृक् ॥ २० ॥

सविता तो मी नारायण । ऐसें डोळ्यांमाजीं करी ध्यान । तेव्हां डोळाचि मद्रूप जाण । सविता आपण स्वयें होय ॥ १३ ॥ एवं डोळा सविता हें माझें ध्यान । तिहींस एकात्मता झाल्या जाण । तेव्हां

—आतां गुणहेतुक सिद्धि सांगतात—

श्वेतद्वीपपतौ शुद्धधर्ममये मयि चित्तं धारयन् षडूर्मिरहितः नरः श्वेततां याति—श्वेतद्वीपाचा अधिपति, सत्त्वात्मक व धर्ममय अशा माझ्या ठिकाणीं चित्ताचें धारण करणारा, क्षुधा-तृषा इत्यादि सहा ऊर्मींनीं रहित असलेला पुरुष शुद्धरूपतेला प्राप्त होतो. १८.

जो रज-तमांस कार्यांसह दूर सोडून सत्त्वगुणांच्या आश्रयभूत मज श्रीहरीचे ठिकाणीं विश्वव्यापकतेनें निरंतर ध्यानधारणा धरितो, ७ तो माझ्या सत्त्वानें युक्त होऊन षड्ऊर्मिरहित होतो. त्याला शोक, मोह, जरा, मृत्यु, क्षुधा, तृषा कधीं शिवतहि नाहींत. १०८.

आकाशात्मनि प्राणे मयि मनसा घोषं उद्वहन् असौ हंसः—आकाशरूप जो समष्टि प्राण तद्रूप असलेल्या माझ्या ठिकाणीं मनानें नादाचें चिंतन करणारा हा जीव, **तत्र उपलब्धा भूतानां वाचः शृणोति**—आकाशाविषयींचा ज्ञाता होऊन त्यांतील भूतांच्या विचित्र वाणी ऐकतो, किंवा त्या आकाशांत अभिव्यक्त झालेल्या ज्या भूतांच्या वाणी त्या दुरूनच ऐकतो. १९.

नादासह शब्दाचा सर्व महिमा आकाशांत विश्रांतिसाठीं अवश्य येतो, पण त्या आकाशाचाहि मी आत्मा आहें. माझ्यामध्येंच आकाश रहात असतें. ९ तो मी नादासह सर्व प्राणांचाहि प्राण, सर्व वाणींचीहि वाणी व सरस्वतीचें जीवनहि मीच आहें. हे उद्धवा ! तूं हें अगदीं सत्य समज. ११० जो अशा माझें आपल्या हृदयांत दृढ ध्यान करील, तो आकाशांत ऐकूं येणारे दूरदूरचे विविध शब्द स्वतः जीवरूपानें ऐकूं शकेल. ११ माझें नादयुक्त ध्यान केलें असतां, जगांतील अगदीं गुप्त गोष्टीहि सहज कानांवर येऊन पडतात. त्यावेळीं दूर श्रवणसिद्धि साध्य होते. ११२.

चक्षुः त्वष्टरि संयोज्य—नेत्र अपरिछिन्न आदित्यांमध्यें संयुक्त करून, **त्वष्टारं अपि चक्षुषि**—व त्या आदित्यालाहि चक्षूंमध्यें संयुक्त करून, **तत्र मां मनसा ध्यायन् सूक्ष्मदृक् विश्वं पश्यति**—त्यांत माझें मनानें ध्यान करणारा योगी विश्वाला दुरून पहातो. २०.

सूर्यच मी नारायण आहें, अशा दृष्टीनें जो डोळ्यांमध्यें माझें ध्यान करितो, तो त्याची दृष्टि मद्रूप होऊन तो स्वतःच सूर्यस्वरूप होतो. १३ याचप्रमाणें नेत्रच सूर्य आहे, असें माझें ध्यान केल्यानें डोळा, सूर्य व मी या

सूक्ष्मद्रष्टा होय आपण । जग संपूर्ण तो देखे ॥ १४ ॥ बैसलेचि ठायीं जाण । चतुर्दशभुवनांचें दर्शन । एके काळें देखे आपण । दूरदर्शन हे सिद्धी ॥ १५ ॥

मनो मयि सुसंयोज्य देहं तदनु वायुना । मद्धारणानुभावेन तत्रात्मा यत्र वै मनः ॥ २१ ॥

अत्यंत सवेग तें मन । त्या मनाचेंही मी मन जाण । त्या मनासी मजसीं अभिन्न । प्राणधारणयुक्त राखे ॥ १६ ॥ ऐसें प्राणधारणयुक्त मन । मजसीं राखितां अभिन्न । त्या धारणाप्रभावें जाण । मनोवेगें गमन देहासी होय ॥ १७ ॥ जेथें संकल्पें जाय मन । तेथें होय देहाचेंही गमन । हे मनोजवसिद्धी जाण । धारणालक्षण या हेतू ॥ १८ ॥

यदा मन उपादाय यद्यद्रूपं बुभूषति । तत्तद्भवेन्मनोरूपं मद्योगबलमाश्रयः ॥ २२ ॥

पहिली मनोजवधारणा । त्याहीवरी माझी भावना । अचिंत्य सामर्थ्य माझें जाणा । अनुसंधाना जो आणी ॥ १९ ॥ मी नाना रूपांतें धरिता । सवेंचि रूपांतरें विसर्जिता । ऐशी माझी संपूर्ण सत्ता । ते त्याच्या हाता पैं लाभे ॥ १२० ॥ एवं माझिया दृढ धारणा । माझें सामर्थ्य ये त्याच्या मना । मग ज्या रूपाची करी भावना । तद्रूप जाणा स्वयें होय ॥ २१ ॥ सुरनरपन्नगांमाजीं जें जें रूप । धरावया करी जो संकल्प । तो तत्काळ गा मद्रूप । हे कामरूप सिद्धी माझी ॥ २२ ॥

तिहींची एकात्मता झाली म्हणजे तो सूक्ष्म द्रष्टा होऊन सगळ्या जगाला पाहूं शकतो. १४ तो बसल्या जागेवरून चौदा भुवनें एकाच वेळीं पाहूं शकतो. ही दूरदर्शनसिद्धि जाणावी. ११५.

मनः देहं च तदनुवायुना मयि सुसंयोज्य–मन व देह यांना त्यांच्या मागोमाग रहाणाऱ्या वायूसह मजमध्यें संयुक्त करून, मद्धारणानुभावेन–माझ्या धारणेच्या प्रभावानें, यत्र वै मनः तत्र आत्मा–जेथें मन जातें तेथें देहहि जातो. [किंवा वायूसह देहाला व आपल्याला माझ्या ठिकाणीं सुसंयुक्त करून मन जेथें जातें, तेथें त्याच्या मागोमाग देहहि जातो, असाहि या श्लोकाचा अर्थ संभवतो. यापक्षीं अन्वय असा करावा–वायुनासह आत्मानं देहं च मयि सुसंयोज्य मनः यत्र याति तदनु तत्र देहः याति.] २१.

मन अत्यंत गतिमान् आहे तरी त्या मनाचेंहि मन मीच आहें, असें समज. जो प्राणधारणेनें त्या मनाला व मला एकत्र ठेवितो, १६ असें प्राणायामासह मन माझ्याशीं एकरूप केलें असतां त्या ध्यानाच्या प्रभावानें देहहि मनोवेगानेंच जातो व येतो. १७ जेथें मन संकल्पानें जातें, तेथें देहहि प्रवेश करितो. हीच मनोजयसिद्धि होय. धारणा हें तिचें निमित्त आहे. ११८.

यदा मनः उपादाय यत् यत् रूपं बुभूषति–जेव्हां योगी मनाला उपादान कारण करून जें जें देवादिरूप संपादन करण्याची इच्छा करितो, तत् तत् मनोरूपं भवेत्–तेव्हां मनानें इच्छिलेल्या त्या त्या स्वरूपाचा होतो. [तो कसा !] मद्योगबलं आश्रयः–जो मी अचिन्त्यशक्ति नानाकार ईश्वर त्या माझ्या ठिकाणीं केलेली जी मनाची धारणा तिचा प्रभाव हेंच त्या रूपाचें कारण आहे. २२.

अगोदरच मनोजवधारणा व त्यांत आणखी माझी भावना करून योगी माझ्या अतर्क्य सामर्थ्याचें चिंतन करूं लागला म्हणजे, १९ मी जो अनेकप्रकारचीं रूपें धारण करणारा व लगेच तीं रूपें टाकून देणारा त्या माझी पूर्ण सत्ता त्याला प्राप्त होते. १२० याप्रकारें माझें दृढ ध्यान केलें असतां, त्याच्या मनाला माझें सामर्थ्य प्राप्त होतें. मग तो ज्या रूपाची भावना करितो, त्या रूपाचा तत्काल बनतो. २१ देव-मनुष्य-नाग इत्यादिकांतील जें जें रूप धारण करण्याची तो इच्छा करितो, त्या रूपाचा तो तत्क्षणीं होतो. ही माझी कामरूपसिद्धि होय. १२२.

परकायं विशन् सिद्ध आत्मानं तत्र भावयेत् । पिण्डं हित्वा विशेत्प्राणो वायुभूतः षडङ्घ्रिवत् ॥ २३ ॥

परकायप्रवेशु करितां जाणा । आवरूनि स्वदेहींच्या सर्व प्राणां । जेथ प्रवेश करितां आपणा । तेथ आपुली भावना करावी ॥ २३ ॥ तेव्हां लिंगदेहाचे माथां । जीवप्राणांची एकात्मता । धरोनि देहांतरअहंता । बाह्य वायूच्या पंथा मिळोनि जाय ॥ २४ ॥ तेथ मिळतांचि मिळवणी । या देहाचा अभिमान सांडूनी । देहांतरीं प्रवेशोनी । मी म्हणोनि उठे तेथें ॥ २५ ॥ जैसें कमळींहूनि कमळांतरा । वायुबळें प्रवेशणें भ्रमरा । तैसें सांडोनियां स्वशरीरा । देहांतरा जीवू जाये ॥ २६ ॥ हें परकायप्रवेशन । म्यां सांगीतलें संपूर्ण । माझिया स्वरूपाचें धारण । तें निजलक्षण अवधारीं ॥ २७ ॥ दृढ ध्यातां माझे स्वरूपासी । तैं सर्व देहीं तूंचि आहेसी । न सांडितां निजदेहासी । हा परकायेंसीं प्रवेशु ॥ २८ ॥ स्वसत्ता स्वदेह सांडणें । तेचि अर्थींचीं लक्षणें । पुढिले श्लोकीं नारायणें । विशद निरूपणें निरूपिलीं ॥ २९ ॥

पाष्ण्याऽऽपीड्य गुदं प्राणं हृदुरःकण्ठमूर्धसु । आरोप्य ब्रह्मरन्ध्रेण ब्रह्म नीत्वोत्सृजेत्तनुम् ॥ २४ ॥

देहत्यागाचें प्राणधारण । तेंच स्वच्छंदमृत्यूचें लक्षण । तदर्थीं जें प्राणोत्क्रमण । तें योगधारण अवधारीं ॥ १३० ॥ मूळाधारीं वामचरण । टांचेचेनि नेटें जाण । अपानाचें अधोगमन । गुद पीडून राखावें ॥ ३१ ॥ हृदयीं विचरता जो प्राण । त्याचें सदा ऊर्ध्व गमन । तो प्राणायामें आवरून । अधोमुख जाण करावा ॥ ३२ ॥ आपानाचें ऊर्ध्व गमन । स्वाधिष्ठानपर्यंत जाण । प्राणाचें

परकायं विशन् सिद्धः तत्र आत्मानं भावयेत्—परशरीरामध्यें प्रवेश करण्याची इच्छा करणाऱ्या सिद्धानें त्या शरीरांत आपलें चिंतन करावें. ततः पिण्डं हित्वा प्राणः वायुभूतः षडङ्घ्रिवत् विशेत्—नंतर स्वदेहाला सोडून प्राणप्रधान लिंगशरीरोपाधि जीव वायूच्या मार्गानें भ्रमराप्रमाणें परशरीरांत प्रवेश करितो. [भ्रमर एका पुष्पावरून दुसऱ्या पुष्पावर जसा अनायासानें जातो, त्याप्रमाणें हा योगी अनायासानें परशरीरांत प्रवेश करितो.] २३.

परकायाप्रवेश करितेवेळीं आपल्या देहांतील सर्व प्राणांना आंवरून, ज्या देहांत प्रवेश करावयाचा असेल त्या देहांत आपली भावना करावी. २३ त्यावेळीं त्यांतील लिंगदेहामध्यें याच्या जीवप्राणांचें ऐक्य होऊन तो देहच मी अशी अहंता धरल्यामुळें तो बाह्य वायूच्या मार्गानें त्याच्याशीं मिळून जातो. २४ त्या देहाचा संयोग होतांच, पहिल्या देहावरील अभिमान सोडून दुसऱ्या देहांत प्रवेश करून त्यावर 'मी' असा अभिमान ठेवून तो उठतो. २५ ज्याप्रमाणें भ्रमर वायुवेगानें एका कमळांतून निघून दुसऱ्या कमळांत प्रवेश करितो, त्याप्रमाणें जीव आपला देह सोडून दुसऱ्या देहांत प्रवेश करितो. २६ हा परकायाप्रवेश मीं तुला सविस्तर सांगितला. आतां माझ्या स्वरूपाची ध्यानधारणा कशी करावी त्याचेंहि लक्षण सांगतों, ऐक. २७ माझ्या स्वरूपाचें दृढ ध्यान केलें असतां व सर्व देहांत मीच आहें अशी भावना धरिली असतां आपलें शरीर न सोडितां परकायाप्रवेश करितां येतो. २८ आपल्या सत्तेनें आपला देह कसा सोडितां येतो, त्याचीं सर्व लक्षणें पुढील श्लोकांत नारायणानें स्पष्ट निरूपण करून सांगितलीं आहेत. १२९.

—'शरीराचा त्याग करून' असें वरच्या श्लोकांत म्हटलें, त्याचा प्रकार सांगणारे भगवान् स्वच्छंद मृत्यु सांगतात—

पाष्ण्या गुदं आपीड्य—टाचेनें गुदद्वार बंद करून, प्राणं हृदुरःकण्ठमूर्धसु—प्राणोपाधि आत्म्याला हृदय, उरःस्थल, कंठ व मूर्धा या स्थानीं चढवून, ब्रह्मरन्ध्रेण ब्रह्म नीत्वा—मूर्धद्वारानें त्याला ब्रह्मामध्यें किंवा दुसऱ्याहि अपेक्षित स्थानीं नेऊन, तनुं उत्सृजेत्—शरीराचा त्याग करावा. २४.

देहत्याग करूनहि प्राण धारण करणें हेंच स्वच्छंद मृत्यूचें लक्षण आहे. त्यासाठीं जो प्राण बाहेर पडतो तेंच योगधारण होय, असें समज. १३० मूळाधाराशीं डाव्या पायाची टांच नेटानें लावून पश्चिमद्वार दाबून अपानाचें अधोगमन बंद करावें ३१ हृदयांत फिरणारा प्राण नेहमीं ऊर्ध्व-मुख वर जात असतो. त्याला प्राणायामानें आंवरून अधोमुख करावा. ३२ अपानवायु वर चढून स्वाधिष्ठानापर्यंत जातो व प्राण खालीं त्याच चक्रापर्यंत

अधःसंचरण । तेंचि चक्रीं जाण जैं घडे ॥ ३३ ॥ तेथ प्राणापानांची बुझावण । त्या चक्रामाजीं करी समान । ऐक्यें पडिलें आलिंगन । एकात्मता जाण चालिले ॥ ३४ ॥ सांडोनि अपानाची अधोवाट । प्राणें त्यजिला हृदयकंठ । फोडूनि सुषम्नेचें कपाट । ऊर्ध्व मुखें नीट चालिले ॥ ३५ ॥ जिणतां सुषुम्नेचें घर । भेदिले साही चक्रांचे पदर । उघडूनि काकीमुखाचें द्वार । ब्रह्मरंध्र ठाकिलें ॥ ३६ ॥ तेथें पावल्या यथानिगुतीं । या देहाची सांडूनि स्थिती । जो कामभोग वाहे चित्तीं । त्या देहाची प्राप्ती तो पावे ॥ ३७ ॥ वैकुंठ कैलास अमरावती । सार्वभौम चक्रवर्ती । जे कामना कामचित्तीं । ते पावे गती तत्काळ ॥ ३८ ॥ जरी तो ब्रह्मसायुज्यता वाहे । तरी सांडूनि देहाची सोये । शुद्ध ब्रह्मधारणा पाहे । तो ब्रह्मचि होये स्वतःसिद्ध ॥ ३९ ॥ यापरी प्राणधारण । करूनि निवर्ते तो जाण । तें स्वच्छंदमृत्यूचें लक्षण । त्या आधीन कळिकाळ ॥ १४० ॥

विहरिष्यन्सुराक्रीडे मत्स्थं सत्त्वं विभावयेत् । विमानेनोपतिष्ठन्ति सत्त्ववृत्तीः सुरस्त्रियः ॥ २५ ॥

देवांचे दिव्यभोगीं आसक्त । योगियांचें झाल्या चित्त । ते प्राप्तिलागीं येथ । माझें सत्त्व निश्चित चिंतावें ॥ ४१ ॥ जेणें सत्त्वें म्यां जाण । स्वर्गीं स्थापिले सुरगण । त्या सत्वगुणाचें धारण । निजहृदयीं जाण जो राखे ॥ ४२ ॥ ध्यातां सुरस्त्रियांची कामनिष्ठा । तो पावे सुरस्वर्गींची प्रतिष्ठा । विमानीं चढोनि वरिष्ठा । करी कामचेष्टा अप्सरांसीं ॥ ४३ ॥

यथा संकल्पेद्‌बुद्ध्या यदा वा मत्परः पुमान् । मयि सत्ये मनो युञ्जंस्तथा तत्समुपाश्नुते ॥ २६ ॥

येतो. ३३ तेव्हां तेथें प्राण व अपान या दोन वायूंचा मिलाफ होऊन ते सम-समान होतात. ते ऐक्यानें परस्परांना आलिंगन देऊन एकात्मतेनें चालतात. ३४ अपानाचा खालचा मार्ग सोडून प्राण आपला हृदय व कंठ हा मार्ग सोडून दोघेहि सुषुम्नेचें द्वार खुलें करून तिच्या विवरांतून सरळ वर जातात. ३५ सुषुम्नेचें घर स्वाधीन करून घेतलें असतां सहाहि चक्रांचे पदर उघडून काकीमुखाचें द्वार जे ब्रह्मरंध्र त्याला जाऊन पोंचतात. ३६ तेथें निर्विघ्नपणें जाऊन पोंचले असतां ते असलेला देह सोडून, मनांत संकल्प केलेल्या देहाला प्राप्त होतात. ३७ वैकुंठ, कैलास किंवा आमरावती या स्थानीं जाण्याची इच्छा होतांच साधक तत्काल तेथें जाऊन पोंचतो. किंवा सार्वभौम चक्रवर्ति राजा होण्याची इच्छा झाल्यास तत्क्षणीं त्या पदाला तो प्राप्त होतो. ३८ किंवा तो जर ब्रह्मस्वरूपाचीच भावना करील, तर तो पूर्वदेहाचें भान सोडून ब्रह्मचिंतनांत मग्न होऊन स्वतःसिद्ध ब्रह्मरूपच होईल. ३९ याप्रमाणें प्राणधारणा करून देहत्याग करणें, हेंच इच्छामरणाचें लक्षण आहे. कारण कळिकाळ त्याच्या अधीन असतो. १४०.

सुराक्रीडे विहरिष्यन्–देवांच्या नंदनवनादि क्रीडास्थानीं विहार करण्याची इच्छा करणाऱ्या योग्यानें, मत्स्थं सत्त्वं विभावयेत्–मद्रूप शुद्ध सत्वाचें चिंतन करावें. म्हणजे, सत्त्ववृत्तीः सुरस्त्रियः विमानेन उपतिष्ठन्ति–सत्वांशभूत देवस्त्रिया विमानानें त्याच्यापाशीं येतात. २५.

योग्याचें मन जर देवांचे दिव्यभोग भोगण्याची इच्छा करील, तर त्यानें माझ्या शुद्ध सत्त्वाचें चिंतन करावें ४१ स्वर्गांत मीं देवादिकांची स्थापना ज्या सत्त्वाच्या योगानें केली आहे, त्या सत्त्वगुणाची जो आपल्या हृदयांत धारणा करितो, ४२ किंवा देवस्त्रियांच्या क्रीडेची इच्छा करितो, तो स्वर्गांतील देवांच्या सन्मानालाहि प्राप्त होतो. तो श्रेष्ठ विमानांत बसून अप्सरांशीं यथेच्छ विलास भोगितो. १४३.

पुमान् मत्परः सन् मयि सत्ये मनो युञ्जन् बुद्ध्या यथा सङ्कल्पयेत् यदा वा–पुरुष मत्परायण होऊन सत्य अशा मजमध्यें मनाला स्थिर करून आपल्या बुद्धीनें व ज्यावेळीं किंवा अवेळीं संकल्प करितो, तथा तत्समुपाश्नुते–त्यांनाच तो उत्तमप्रकारें प्राप्त होतो, किंवा जसा संकल्प करील व मत्परायण होऊन माझ्या ठिकाणीं विश्वासवान् होईल. तदनुरूप त्याला प्राप्त होईल. (कोणत्या उपायानें !–)सत्यसंकल्प जो मी त्या माझ्या ठिकाणीं मनाला युक्त करीत होत्साता सर्व अनुरूप फलाला प्राप्त होईल. २६.

संकल्पमात्रें करी समस्त। जो मी सत्यसंकल्प भगवंत। त्या माझे ठायीं चित्त। विश्वासयुक्त जो राखे ॥ ४४ ॥ तो जे जे काळीं जे जे देशीं। जे जे कर्मीं जे जे अवस्थेसी। जें जें कांहीं वांछी मानसीं। ते संकल्प त्यापाशीं सदा सफळ ॥ ४५ ॥ मी सत्यसंकल्प भगवंत। हृदयीं धरिल्या ध्यान-युक्त। त्याचें जे जे काम कामी चित्त। ते संकल्प प्राप्त होती त्यासी ॥ ४६ ॥

यो वै मद्भावमापन्न ईशितुर्वशितुः पुमान्। कुतश्चिन्न विहन्येत तस्य चाज्ञा यथा मम ॥ २७ ॥

जो कां मी सर्वांचा नियंता। स्वयें स्वतंत्र तत्त्वतां। त्या माझें ध्यान करितां। मद्भावता उपतिष्ठे ॥ ४७ ॥ मीचि भगवंत सुनिश्चित। ऐसें बोधा आलें यथास्थित। त्याची आज्ञा सुरवर वंदित। पशुपक्षी नुल्लंघित ते आज्ञा ॥ ४८ ॥ जैशी माझी आज्ञा सर्वांवरी। तैशी त्याची आज्ञा चराचरीं। कोणी नुल्लंघिती तिळभरी। हे आज्ञासिद्धी खरी तो लाहे ॥ ४९ ॥ एवं या गुणहेतुसिद्धी दहाही। धारणायुक्त सांगीतल्या पाहीं। आतां क्षुद्र पंच सिद्धी ज्याही। तुज मी त्याही सांगेन ॥ १५० ॥

मद्भक्त्या शुद्धसत्त्वस्य योगिनो धारणाविदः। तस्य त्रैकालिकी बुद्धिर्जन्ममृत्यूपबृंहिता ॥ २८ ॥

जगाचें उत्पत्तिस्थितिनिधन। सत्यत्वें असे मजअधीन। त्या माझ्या ठायीं करितां भजन। अंतःकरण अतिशुद्ध ॥ ५१ ॥ ते शुद्ध अंतःकरणीं जाण। भूत भविष्य वर्तमान। जगाचें जन्म भोग मरण। हे त्रिकाळज्ञान सिद्धी प्रकटे ॥ ५२ ॥

केवल संकल्पानेंच सर्व करणारा जो मी सत्यसंकल्प भगवान् त्या माझ्यामध्यें जो विश्वासयुक्त चित्त ठेवितो, ४४ तो ज्या ज्या काळीं, ज्या ज्या देशीं, ज्या ज्या अवस्थेंत, जें जें कांहीं मनांत इच्छितो, ते ते त्याचे सर्व मनोरथ तत्काल सफल होतात. ४५ मज सत्यसंकल्प भगवानाचें जो हृदयांत ध्यान करितो, त्याच्या मनांत ज्या ज्या इच्छा असतात, त्या त्या सर्व पूर्ण होतात. १४६.

यः वै पुमान् ईशितुः वशितुः मद्भावं आपन्नः—जो पुरुष सर्व नियंता व स्वतंत्र अशा माझ्या स्वभावाला प्राप्त झाला, तस्य च आज्ञा यथा मम तथा कुतश्चित् न विहन्येत—त्याची आज्ञा माझ्या आज्ञेप्रमाणेंच कोणाकडूनहि अमान्य केली जात नाहीं. [या सत्त्वादिक गुणहेतुक सिद्धि आहेत.] २७.

मी जो सर्वांचें नियमन करणारा, स्वभावतःच स्वतंत्र, त्या माझें ध्यान केलें असतां मत्स्वरूपता प्राप्त होते. ४७ मीच खात्रीनें भगवान् आहें, असें ज्याच्या प्रत्ययास येतें, त्याची आज्ञा श्रेष्ठ देव शिरसावंद्य मानितात. पशु-पक्षीहि त्याच्या आज्ञेचें उल्लंघन करीत नाहींत. ४८ माझी आज्ञा जशी सर्वांना मान्य असते, तसेंच त्याच्या आज्ञेचें सगळ्या चराचर सृष्टींत कोणी तिळभरहि उल्लंघन करीत नाहीं. तो अशी खरी आज्ञासिद्धि मिळवितो. ४९ अशा-प्रकारच्या या दहाहि धारणायुक्त गुणहेतुसिद्धि सांगितल्या. आतां ज्या क्षुद्र पांच सिद्धि राहिल्या, त्याहि तुला सांगतों, ऐक. १५०.

—आतां यापुढें क्षुद्रसिद्धि सांगतात—

मद्भक्त्या शुद्धसत्त्वस्य धारणाविदः तस्य योगिनः—माझ्या भक्तीनें ज्याचें चित्त शुद्ध झालें आहे व जो त्रिकालज्ञ ईश्वराच्या ठिकाणीं धारणा कशी करावी हें जाणतो, त्या योग्याची, बुद्धिः जन्ममृत्यूपबृंहिता त्रैकालिकी भवति—बुद्धि, जन्म व मृत्यु यांसह तिन्ही कालांतील विषयांना जाणण्यास समर्थ होतो. [याच सिद्धीनें त्याला दुसऱ्याच्या चित्तादिकांचें ज्ञान होतें, हें सांगितलें.]

जगाचें उत्पत्ति-स्थिति-लय खरोखर माझ्या अधीन आहेत. त्या माझें भजन केलें असतां अंतःकरण अतिशय शुद्ध होतें, ५१ व त्या शुद्ध अंतःकरणांत भूत, भविष्य, वर्तमान व जगाचे भोग, जन्म, मरण या सर्वांच्या त्रिकाल ज्ञानाची स्थिति प्रकट होते. १५२.

अग्न्यादिभिर्न हन्येत मुनेर्योगमयं वपुः । मद्योगश्रान्तचित्तस्य यादसामुदकं यथा ॥ २९ ॥

अतिप्रयास करितां चित्त । मजसी योगातें झालें प्राप्त । तेणें योगें शरीर योगयुक्त । अबाधित महाद्वंद्वीं ॥ ५३ ॥ त्यासी बाधीना शीत उष्ण । मृदु आणिक कठिण । अग्नि लागलियाही जाण । देह दहन नव्हे त्याचा ॥ ५४ ॥ ते अग्निमाजीं विश्रांति त्यासी । जेवीं कां जळीं जळचरांसी । अद्वंद्वतासिद्धी ऐसी । साधकासी उपतिष्ठे ॥ ५५ ॥ येचि सिद्धीच्या धारणा । प्रतिष्टंभसिद्धी प्रकटे जाणा । ऐक तिच्याही लक्षणा । जिचे तोडरीं जाणा सकळ बाधा ॥ ५६ ॥ त्यासी बाह्य वायूचेनि झडाडें । बाधकता कदा न घडे । प्राण जिंतोनि आंतुलीकडे । करी रोकडी दासी त्यासी ॥ ५७॥ देंठ फेडूनि सुमनसेजे । जेवीं कां सुखें निद्रा कीजे । तेवीं इंगळावरी हा निजे । बाधा नुपजे अग्नीची ॥ ५८ ॥ शीतळ जळीं शीतकाळीं । सिद्ध बुडविल्या कौतुकें जळीं । तो बाहेरी निघावया न तळमळी । जळीं मासोळी जेवीं क्रीडे ॥ ५९ ॥ ग्रीष्मकाळींचें निदाघ उष्ण । त्यामाजीं सिद्ध घातल्या जाण । रविकरीं पद्म उल्हासे गहन । तैसें लागतां उष्ण तो टवटवी ॥ १६० ॥ यापरी अर्कबाधकता । त्यासी बांधीन सर्वथा । तैशींच सिद्धासी शस्त्रें लागतां । शस्त्रघाता नातुडे तो ॥ ६१ ॥ आकाशा खोचूं जातां पाहें । शस्त्रेंसीं घावो वायां जाये । तेवीं सिद्धासी न लागती घाये । शस्त्रउपायें सुनाट ॥ ६२ ॥ सिद्धासी दिधलिया विख । विखही नव्हे त्या बाधक । जेवीं विखकिडे विखीं देख । यथासुख क्रीडती ॥ ६३ ॥ छाया पर्वतातळीं दडपितां । ते दाटेना जेवीं पर्वता । तेवीं अग्नि अर्क विष अंबु वाता । सिद्धासी सर्वथा बाधेना ॥ ६४ ॥ ऐकोनि सिद्धींची कथा । उल्हासू जरी माने चित्ता । तरी माझे प्राप्तीसी तत्त्वतां । सिद्धी ॥

मद्योगश्रान्तचित्तस्य मुनेः योगमयं वपुः—माझ्या स्वरूपामध्यें ज्याचें चित्त विश्रांति पावलें आहे, त्या योग्याचें योगमय शरीर (त्याचें चित्त माझ्या ठिकाणीं विश्रांति पावल्यामुळेंच), यथा यादसां उदकं तथा—ज्याप्रमाणें जलजंतूंना जल पीडा देऊं शकत नाहीं त्याप्रमाणें, अग्न्यादिभिः न हन्येत—अग्न्यादिकांकडून नष्ट केलें जात नाहीं. [भगवान् अग्न्यादि सर्व देवतांकडून होणाऱ्या उपद्रवांनीं रहित आहे, अशा भावनेनें ज्याला योगमय शरीर प्राप्त झालेलें आहे, त्या योग्याला अग्न्यादिकांपासून उपद्रव होत नाहीं. या सिद्धीनें अद्वंद्वताहि सांगितली.] २९.

अतिशय आयास करावे तेव्हां चित्त माझ्या स्वरूपाला प्राप्त होतें. त्याच्या योगानें शरीर योगयुक्त होतें व मग महाद्वंद्वांपासूनहि त्याला पीडा होत नाहीं. ५३ त्याला शीत-उष्ण, मऊ-कठिण यांची बाधा होत नाहीं. त्याच्या देहाला अग्नि लाविला तरी सुद्धां तो जळत नाहीं. ५४ जलचरादि मासे जसे पाण्यांत स्वस्थ विसावा घेतात, तसा तो अग्नीमध्यें खुशाल विश्रांति घेतो. अशीहि अद्वंद्वतासिद्धि साधकाला प्राप्त होते. ५५ याच सिद्धीच्या धारणेनें प्रतिष्टंभसिद्धि प्रकट होते. सर्व बाधा जिंकल्याचे पैंजण जिच्या पायांत आहेत अशा तिचेंहि लक्षण आतां ऐक. ५६ त्यांस बाहेरच्या सोसाट्याच्या वायूनें कधीं पीडा होत नाहीं. तो प्राणालाहि जिंकून आपला दास करितो. ५७ देंठ तोडलेल्या पुष्पांच्या शय्येवर जसें सुखानें निजावें, तसा तो जळजळीत निखाऱ्यावर निजतो. त्याला अग्नीपासून यत्किंचित्‌हि बाधा होत नाहीं. ५८ हिंवाळ्यांत कडक थंडीमध्यें या सिद्धाला गार पाण्यांत मौजेनें बुडविलें असतां तो बाहेर येण्यासाठीं मुळींच चळवळ करीत नाहीं. मासा जसा पाण्यांत आनंदानें बागडत असतो तसा तो (पाण्यांत खुशाल रहातो). ५९ किंवा भर उन्हाळ्यांत सिद्धाला रखरखीत उन्हांत उभें केलें तरी सूर्यकमळ जसें सूर्यकिरणानें विकास पावतें, तसा तो उन्हानें अधिक टवटवीत होतो. १६० अशा प्रकारें सिद्धाला सूर्यापासून जसा ताप होत नाहीं, तसाच शस्त्राचाहि त्याच्यावर आघात होत नाहीं. ६१ आकाशाला शस्त्रानें भोसकूं लागल्यास तो प्रयत्न जसा फोल ठरतो, त्याचप्रमाणें सिद्धावर घाव घातला असतां तो व्यर्थ होतो. ६२ सिद्धाला विष दिलें तरी तेंहि त्याला बाधत नाहीं. विषांतील किडे जसे विषांतच मजेनें खेळत असतात, (तसा तोहि सुखानें विष पचवितो). ६३ छाया जर पर्वताखालीं दडपून ठेविली तर ती कांहीं पर्वताच्या स्थितीला अडचण करीत नाहीं. त्याप्रमाणें सिद्धाला अग्नि, सूर्य, विष, जल, वायु हीं केव्हांहि बाधत नाहींत. ६४ या सिद्धीच्या गोष्टी ऐकून

सर्वथा बाधक ॥ ६५ ॥ माझें स्वरूप शुद्ध अद्वैत । तेथ सिद्धींचे जे मनोरथ । लोकरंजन समस्त । नाहीं परमार्थ सिद्धींमाजीं ॥ ६६ ॥ मागिलेचि श्लोकसंधीं । परचित्ताभिज्ञतेची सिद्धी । ध्वनित सुचविली त्रिशुद्धी । तिचाही विधी अवधारीं ॥ ६७ ॥ तेच श्लोकीं व्याख्यान । करितां भगवंताचें ध्यान । प्रकृतिनियंता आपण । साक्षी जाण सर्वांचा ॥ ६८ ॥ ऐसें ईश्वरत्व दृढ ध्यातां । चित्तचालकता ये त्याच्या हाता । तेव्हां चित्ताची अभिज्ञता । स्वभावतां उपतिष्ठे ॥ ६९ ॥ तेव्हां जीवाची स्वप्नावस्था । हा साक्षित्वें देखता । जो जो संकल्प त्याच्या चित्ता । तो स्वभावतां हा जाणे ॥ १७० ॥ जिव्हारींची जे आवडी मोटी । ते हा अवलीला सांगे गोष्टी । एवढी सिद्धीची कसवटी । उठाउठी तो लाभे ॥ ७१ ॥

मद्विभूतीरभिध्यायन् श्रीवत्सास्त्रविभूषिताः । ध्वजातपत्रव्यजनैः स भवेदपराजित : ॥ ३० ॥

अपराजयसिद्धी प्राप्ती । ध्याना आणावी माझी मूर्ती । जिचेनि नांवें जयो पावती । जाण निश्चितीं सुरवर ॥ ७२ ॥ चतुर्भुज घनश्याम । शंखचक्रगदापद्म । छत्रातपत्र चामरयुग्म । ध्वजीं उत्तम गरुडलांछन ॥ ७३ ॥ रत्नदंडें झणत्कार । व्यजन वीजिती सनागर । चरणीं गर्जती तोडर । तोडरीं अपार अरिवर्ग ॥ ७४ ॥ ऐशिये माझे मूर्तीचें ध्यान । जो सर्वदा करी सावधान । तो सर्वत्र विजयी जाण । अभंगपण माझेनी ॥ ७५ ॥ तो माझेनि ध्यानें पाहें । कोणी न मेळवितां साह्ये । एकला सर्वत्र विजयी होये । ऐशी सिद्धी लाहे या निष्ठा ॥ ७६ ॥ जो मी हृदयीं धरी अजितू । तो सर्वत्र होय अपराजितू । ऐसें सांगोनि भगवंतू । उपसंहारितू सिद्धींतें ॥ ७७ ॥

मनाला मोठा उल्हास वाटतो खरा; पण या सगळ्या सिद्धि माझ्या प्राप्तीला बाधक आहेत. ६५ माझें स्वरूप शुद्ध अद्वैत आहे व सिद्धीचे सर्व मनोरथ लोकरंजनासाठीं आहेत. त्या सिद्धींत परमार्थ नाहीं. ६६ मागील श्लोकाच्या शेवटीं 'परचित्ताभिज्ञता सिद्धि' असा उल्लेख केला होता. तिचेंहि लक्षण आतां ऐक. ६७ त्याच श्लोकांत असेंहि सांगितलें आहे कीं, प्रकृतीचें नियमन करणारा, सर्वांचा साक्षी मीच आहें, ६८ असें भगवानाचें ध्यान केलें असतां व त्याच्या अशा ईश्वरत्वाचें दृढ चिंतन केलें असतां चित्तचालकता त्याच्या हातांत येते व चित्ताचा जाणतेपणा त्याला स्वभावतःच साध्य होतो. ६९ त्यावेळीं तो जीवाची स्वप्नस्थिति साक्षित्वानें पहात असतो. त्याच्या चित्तांत जो जो संकल्प होतो, तो तो त्याला स्वभावतःच कळतो. १७० अंतःकरणांतील गुप्त गोष्टीहि हा सिद्ध सहज सांगूं शकतो. एवढी या सिद्धीची महति त्याला तत्काल लाभते. १७१.

ध्वजातपत्रव्यजनैःसह श्रीवत्सास्त्रविभूषिताः मद्विभूतिः अभिध्यायन् सः अपराजितः भवेत्–ध्वज, छत्र, व्यजन यांसह श्रीवत्स व अस्त्र यांनीं विभूषित झालेल्या माझ्या अवतारांचें प्राधान्यानें ध्यान करणारा योगी अपराजित होतो. ३०

जिच्या योगें देवादिकांना जय मिळतो ती 'अपराजय' सिद्धि प्राप्त करून घ्यावयाची असली तर माझ्या मूर्तीचें ध्यान करावें. ७२ चतुर्भुज, घनश्याम; हातांत शंख, चक्र, गदा, पद्म; मस्तकावर छत्र, चामर, अब्दागीर; गरुडलांछन असलेला उत्तम ध्वज; ७३ रत्नदंडाच्या झणत्कारानें सुशोभित पंखा हालत आहे; पायांतील नूपुराचा नाद होत आहे; असंख्य शत्रूंना जिंकून ज्यानें पायांखालीं दडपून ठेविलें आहे, ७४ अशा माझ्या मूर्तीचें ध्यान जो सर्वकाळ सावधानपणानें करीत असतो, तो माझ्या अभंगपणानें सर्वत्र विजयी होतो. ७५ तो केवळ माझ्या ध्यानाच्या योगानें, कोणाचेंहि साह्य न घेतां एकटा 'सर्व ठिकाणीं' जय मिळवितो. माझ्या निष्ठेनें अशी सिद्धि त्याला प्राप्त होते. ७६ जो मज अजिंक्य परमात्म्याला हृदयांत धारण करितो, तो सर्वत्र अजिंक्य होतो, असें सांगून भगवान् सिद्धींचा उपसंहार करितात. १७७.

उपासकस्य मामेवं योगधारणया मुनेः । सिद्धयः पूर्वकथिता उपतिष्ठन्त्यशेषतः ॥ ३१ ॥

म्यां सांगीतल्या ज्या योगधारणा । मज भजतां त्या भावना । त्या त्या सिद्धी त्यासी जाणा । पूर्वोक्तलक्षणा उपजती ॥ ७८ ॥ अनेक भावना धरितां चित्तीं । त्या त्या धारणेच्या व्युत्पत्ती । अनेक सिद्धींची होय प्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७९ ॥ नाना योगधारणाव्युत्पत्ती । न करितां सकळ सिद्धींची प्राप्ती । एके धारणेनें होय निश्चिती । ते मी तुजप्रती सांगेन ॥ १८० ॥

जितेन्द्रियस्य दान्तस्य जितश्वासात्मनो मुनेः । मद्धारणां धारयतः का सा सिद्धिः सुदुर्लभा ॥ ३२ ॥

पांच पांच इंद्रियांची जोडी । जिणोनि शमदमपरवडी । उभवूनि वैराग्याची गुढी । प्राणापान-वोढी जिंकिल्या ॥ ८१ ॥ विवेकाचेनि बळे जाण । वृत्ति राखोनि सावधान । सदा करितां माझें मनन । मननें मन जिंकिलें ॥ ८२ ॥ या परी गा साधकासी । धारणा धरोनि मानसी । मी एक ध्यातां अहर्निशीं । सकळ सिद्धी दासी त्यासी होती ॥ ८३ ॥ सांडूनि सकळ उपाये । मी एक ध्यानीं धरिल्या पाहें । साधकासी काय उणे आहे । दुर्लभ काये सिद्धींचें ॥ ८४ ॥ माझे भजनें सावकाशीं । सिद्धी प्रकटती साधकासी । त्या सेव्य नव्हती त्यासी । तेंचि हृषीकेशी सांगतू ॥ ८५ ॥

अन्तरायान्वदन्त्येता युञ्जतो योगमुत्तमम् । मया संपद्यमानस्य कालक्षपणहेतवः ॥ ३३ ॥

—आतां या सिद्धींचा उपसंहार करितात—

एवं योगधारणया मां उपासकस्य मुनेः—अशा पृथक् योगधारणादिकांनीं माझी उपासना करणाऱ्या मुनीला, पूर्वकथिताः सिद्धयः अशेषतः उपतिष्ठन्ति—पूर्वी सांगितलेल्या सिद्धि निःशेष प्राप्त होतात. ३१.

मीं ज्या योगधारणा सांगितल्या, त्यांच्या भावनेनें माझें भजन केलें असतां त्या त्या पूर्वोक्त सिद्धि त्याला सहज प्राप्त होतात. ७८ उद्धवा ! मनांत अनेक भावना धरून त्या त्या धारणेच्या योगानें अनेक सिद्धींची प्राप्ति होते, हें तूं निश्चयानें जाण. ७९ अनेक योग-धारणांचीं साधनें केल्यावांचूनच सर्व सिद्धींची प्राप्ति ज्या एका धारणेनें होते, ती मी तुला सांगतों. १८०.

—किंवा या पृथक् पृथक् धारणांच्या प्रयासानें काय करावयाचें आहे ! एकाच धारणेनें सर्व सिद्धि प्राप्त होतात, असें आतां सांगतात—

जितेन्द्रियस्य दान्तस्य जितश्वासामनः मद्धारणां धारयतः मुनेः का सा सिद्धि या सुदुर्लभा—ज्यानें अंतरिंद्रियाचा निग्रह केला आहे, बाह्य इंद्रियांचें नियमन केलें आहे, श्वासोच्छ्वासाच्या गतीला जिंकिलें आहे व पूर्वी 'नारायणे तुरीयाख्ये' [श्लोक—१६] यांत सांगितल्याप्रमाणें माझ्या धारणेचा अभ्यास करीत आहे अशा मुनीला अत्यंत दुर्लभ अशी सिद्धि कोणती आहे ! ३२.

पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें यांची जोडी शम-दमांनीं जिंकून वैराग्याची गुढी उभारून प्राण व अपान यांचें बल कमी केलें असतां, ८१ विवेकाच्या सामर्थ्यानें वृत्तिसमाधान ठेवावें माझें सतत चिंतन करणाराचें मन त्या चिंतनानें जिंकिलें जातें. ८२ अशा रीतीनें साधकानें मनांत धारणा धरून रात्रंदिवस माझेंच ध्यान केल्यास सगळ्या सिद्धि त्याच्या दासी होऊन रहातात. ८३ सर्व उपाय सोडून चित्तांत माझें एकट्याचेंच ध्यान धरिल्यास साधकाला काय कमी आहे ! सिद्धींची दुर्लभता ती काय ! ८४ माझ्या भजनानें साधकाला सिद्धि अवश्य प्राप्त होतात; पण त्यानें त्यांचा उपयोग मात्र करूं नये. हेंच आतां श्रीकृष्ण सांगत आहे. १८५.

—असें जरी आहे तरी या सिद्धि मिळाव्या अशी इच्छा करणें युक्त नाहीं असें आतां सांगतात—

उत्तमं योगं युञ्जतः—उत्तम योगाचा अभ्यास करणाऱ्या व मया संपद्यमानस्य—माझ्याशीं एकरूप होणाऱ्या योग्याच्या, कालक्षपणहेतवः एताः अन्तरायन वदान्ति—कालक्षेपाला कारण अशा या सिद्धींना विघ्नें म्हणतात. ३३.

अहेतुक करितां माझें भजन। तेणें शीघ्र माझी प्राप्ती जाण। तेथें सिद्धींवरी घालिता मन। आली नागवण मत्प्राप्तीसी ॥ ८६ ॥ ज्यासी विषयभोग लागे गोड। तोचि सिद्धींची वाहे चाड। ज्यासी माझें प्राप्तीचें कोड। तो वांछीना बंड ऋद्धिसिद्धींचें ॥ ८७ ॥ ज्यासी लौकिकी अतिप्रतिष्ठा। तो सिद्धींच्या सोशी खटपटा। ज्यासी मत्प्राप्तीची निष्ठा। तो वचेना वाटा सिद्धींच्या ॥८८॥ पात्रतपात्रतां वाराणसी। जो वस्तीसी गेला वेश्यागृहासी। तेथें भुलोनि तिच्या भोगासी। सर्वस्व तियेसी समर्पी ॥ ८९ ॥ इये-पासूनि जीवेंप्राणें। सर्वथा वेगळें नाहीं जाणें। ऐसा संकल्प करोनि तेणें। वश्य होणें वेश्येसी ॥ १९० ॥ जंव असे गांठीं गांठोडी। तंव ते त्यापाशीं लुडबुडी। निःशेष वेंचलिया कवडी। बाहेरीं दवडी तत्काळ ॥ ९१ ॥ तो दवडितांही न जाये। निर्लज्ज विसंगु होऊनि राहे। तरी आपणचि सांडोनि जाये। तैशाचि पाहें महासिद्धी ॥ ९२ ॥ सकळ पापातें निर्दळणें। सकळ कुळांतें उद्धरणें। तें काशीचें खुंटलें पावणें। वेश्यानागवणें भोगलिप्सा ॥ ९३ ॥ तैसीच सिद्धींचीही कथा। माझें प्राप्तीसी प्रतिबंधभूता। माझें ध्यान ज्ञान वैराग्यावस्था। नागवूनि रिता सांडिती ॥ ९४ ॥ माझे प्राप्तीनिकट जाण। उठे सिद्धींची नागवण। भोगें छळावया व्यामोहकपण। विलंबकारण मत्प्राप्ती ॥ ९५ ॥ माझें स्वरूप अद्वैतता। तेथें सिद्धींच्या नानावस्था। ते मायेची व्यामोहकता। जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ९६ ॥ माझे प्राप्तीआड सिद्धींचें विघ्न। हेंचि तुज कळावया जाण। म्यां सर्व सिद्धींचें निरूपण। समूळ संपूर्ण सांगीतलें ॥ ९७ ॥ माझ्या ठायीं धरितां ध्यान। एकाग्रता होतां मन। तेथ भोगिलिया सिद्धी जाण। करिती नागवण साधका ॥ ९८ ॥

माझें निष्काम भजन केल्यानें तत्काल माझी प्राप्ति होते. पण सिद्धीकडे लक्ष गेलें कीं, माझ्या प्राप्तीमध्यें अडथळा आलाच म्हणून समज. ८६ ज्याला विषयभोग गोड वाटतात, त्यालाच सिद्धींची आवड असते; पण ज्याला माझ्या प्राप्तीची उत्कंठा असते, तो ऋद्धि-सिद्धींच्या भानगडींत कधींच पडत नाहीं. ८७ ज्याला लौकिकांत प्रतिष्ठा मिळवावयाची असते, तोच सिद्धींची खटपट करीत बसतो. ज्याची माझ्या प्राप्तीवर निष्ठा असते, तो सिद्धींच्या वाटेलाहि जात नाहीं. ८८ काशीला जाण्यासाठीं निघालेला कोणी एक मनुष्य जातां जातां वाटेंत एका वेश्येच्या घरीं मुक्कामाला गेला व तिला भुलून आपलें सर्वस्व तिला अर्पण करून बसला; ८९ तिच्यापासून आतां प्राण गेला तरी दूर व्हावयाचें नाहीं, असा संकल्प करून तो तिला वश होऊन राहिला. १९० पण जोंपर्यंत त्याच्या गांठीला द्रव्य होतें, तोंपर्यंत ती त्याच्याशीं मोठ्या लाडी-गोडीनें वागली, पण त्याच्या जवळचें धन निःशेष संपल्याबरोबर तिनें त्याला दाराबाहेर घालविलें; ९१ पण तो घालवूनहि जात नाहीं, तसाच निर्लज्ज होऊन कोडग्यासारखा राहिला आहे, असें पहातांच ती वेश्या आपणच त्याला सोडून गेली. त्याप्रमाणेंच ही महासिद्धि आहे. ९२ काशीला जाऊन सगळ्या पातकांचा नाश करावयाचा व सगळ्या कुळाचा उद्धार करायावचा हा मूळचा उद्देश बाजूला राहून तो जसा भोगप्राप्तीच्या आवडीमुळें वेश्येकडून नागवला गेला, ९३ तशीच ही सिद्धींची स्थिति आहे. माझ्या प्राप्तीला अडथळा करणाऱ्या या सिद्धि माझें ध्यान, ज्ञान, विरक्ति या सर्वांना लुटून नेतात व त्याला पोकळ करून ठेवितात. ९४ माझ्या प्राप्तीच्या अगदीं समीप साधकाला या ऋद्धि–सिद्धि लुटावयास सज्ज होतात. भोगाची भुरळ घालून त्या छळतात व त्यामुळें माझी प्राप्ति दुरावते. ९५ हे उद्धवा! माझें स्वरूप अद्वैत आहे. तेथें सिद्धींचे अनेक प्रकार हा केवल मायेचा खेळ आहे, हें खात्रीनें समज. ९६ या सिद्धींचें विघ्न माझ्या प्राप्तीच्या आड येत असतें, हें तुला कळावें, म्हणून मीं तुला सगळ्या सिद्धींचें सविस्तर वर्णन करून सांगितलें. ९७ माझेंच ध्यान करीत असतां एकाग्र चित्त झाल्यावर साधक जर सिद्धींचा उपभोग घेऊं लागला तर त्या त्याला पुरत्या नागवितात, हें लक्षांत ठेव. १९८

जन्मौषधितपोमंत्रैर्यावतीरिह सिद्धयः । योगेनाप्नोति ताः सर्वा नान्यैर्योगगतिं व्रजेत् ॥ ३४ ॥

सिद्धींचें प्राप्तीचें कारण । जन्मौषधि मंत्र तप जाण । कां साधल्या प्राणापान । सकळ सिद्धी जाण योगाभ्यासीं ॥ ९९ ॥ एकी जन्मास्तव सहज सिद्धी । एकी त्या साधिती औषधी । एकी त्या तपादि महाविधी । एकी त्या त्रिशुद्धी मंत्रद्वारा ॥ २०० ॥ सर्पासी वायुधारण । मीनासी जळतरण । पक्ष्यासी नभोगमन । हे जन्मसिद्धी जाण स्वाभाविक ॥ १ ॥ हंस निवडी क्षीरनीर । कोकिळेसी मधुर स्वर । चंद्रामृत सेवी चकोर । हे सिद्धी साचार जन्मास्तव ॥ २ ॥ जन्मास्तव सहज सिद्धी । त्या म्यां सांगीतल्या सुबुद्धी । आतां साधिलिया औषधी । लाभती सिद्धी त्या ऐक ॥ ३ ॥ श्वेतमांदारीं गजानन । अंगारकचतुर्थी साधिल्या जाण । सकळ विद्यांचें होय ज्ञान । धनधान्य समृद्धी ॥ ४ ॥ अजानवृक्षाची वोळखण । त्याचीं फळें श्वानमुखें जाण । त्याचें घडल्या क्षीरपान । होय आपण अजरामर ॥ ५ ॥ पिचुमंद नित्य सेविल्या देख । त्यासी बाधीना कोणी विख । पाताळगरुडाचें प्राशिल्या मुख । त्यासी देहदुःख बाधीना ॥ ६ ॥ पूतिकावृक्षाचे मूळीं । असे महाशक्तीची पुतळी । ते साधल्या अप्सरांचे मेळीं । क्रीडे तत्काळीं साधक ॥ ७ ॥ अनंत औषधी अनंत सिद्धी । त्यांची साधना कठिण त्रिशुद्धी । तपादि सिद्धींचि विधी । ऐक सुबुद्धी उद्धवा ॥ ८ ॥ कृच्छ्र पराक चांद्रायण । आसार जलाशय धूम्रपान । तप करी जें जें भावून । ते ते सिद्धी जाण तो पावे ॥ ९ ॥ ऐक मंत्रसिद्धीचें लक्षण । प्रेतावरी बैसोनि आपण । एक रात्र केल्या अनुष्ठान । प्रेतदेवता संपूर्ण प्रसन्न होय ॥ २१० ॥ तेणें भूत भविष्य वर्तमान ।

——म्हणून ही निष्काम धारणाच करावी, इतर सकाम धारणांचा अभ्यास करूं नये, असें सांगतात——

इह जन्मौषधितपोमंत्रैः यावतीः सिद्धयः ताः सर्वा योगेन आप्नोति—या लोकीं जन्म, औषधी, तप व मंत्र यांनीं जेवढ्या सिद्धि प्राप्त होतात त्या सर्वहि मद्धारणारूप योगानें पुरुषाला प्राप्त होतात, अन्यैः योगगतिं न व्रजेत्—पण मद्धारणायोगावांचून दुसऱ्या कोणत्याहि उपायांनीं मत्सालोक्यादिरूप योगगतीला पुरुष प्राप्त होणार नाहीं. ३४.

सिद्धि प्राप्त होण्यास जन्म, दिव्यऔषधि, मंत्र व तप, हीं साधनें आहेत. किंवा योगाभ्यासानें प्राणापानाला जिंकल्यासहि सर्व सिद्धि मिळतात. ९९ (असें श्रीकृष्ण सांगत आहे.) कोणाला स्वतःच सिद्धि प्राप्त असतात; कोणी त्या औषधींच्या योगानें साधितात; कोणी तपादि महाविधीनें तर कोणी मंत्रद्वारा त्या साध्य करून घेतात. २०० सर्पाला वायुभक्षण; माशाला पाण्यांत पोहणें; पक्ष्याला आकाशांत उडणें या स्वभावतःच जन्मसिद्ध आहेत. १ राजहंस दूध व पाणी वेगळें करितो; कोकिळेचा स्वर उपजतच मधूर असतो; चकोर चंद्रांतील अमृत प्राशन करितो; या सिद्धि उपजतच प्राप्त होतात. २ या जन्मसिद्ध सिद्धि मीं सांगितल्या. आतां हे बुद्धिमान् उद्धवा ! औषधींपासून साधणाऱ्या सिद्धि सांगतों, त्या ऐक. ३ पांढऱ्या मांदार वृक्षाखालीं एकवीस वर्षें मंगळवारीं येणाऱ्या अंगारकी-चतुर्थीचें व्रत केलें असतां, त्या वृक्षाखालीं गणपतीच्या मूर्तीची प्राप्ति होते व त्यायोगें सगळ्या विद्यांचें ज्ञान होऊन घरांत धन-धान्याची समृद्धि होते. ४ या अजानवृक्षाला ओळखण्याची खूण म्हणजे त्याचीं फळें कुत्र्याच्या तोंडासारखीं असतात. त्या वृक्षाचा चिक प्राशन करणारा अजरामर होतो. (असा वृक्ष आळंदीस श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीपाशीं आहे, असें श्री. पांगारकर म्हणतात.) ५ नित्य कडुलिंबाचें सेवन करणाराला कसलेंहि विष बाधत नाहीं. पाताळ गरुडीचें मुख प्राशन करणाराला देहदुःखाचे क्लेश होत नाहींत. ६ पूतिकावृक्षाची मुळी म्हणजे एक महान् शक्तीची मूर्तीच आहे. ती हातीं आल्यास साधक अप्सरांच्या मेळ्यांत जाऊन तत्काल त्यांच्याशीं क्रीडा करितो. ७ अशा असंख्य औषधि आहेत व त्यांच्या असंख्य सिद्धि आहेत. त्या साध्य करून घेणें खरोखर फार कठिण आहे. म्हणून आतां तपानें प्राप्त होणाऱ्या सिद्धींचे प्रकार ऐक. हे बुद्धिमान् उद्धवा ! ८ कृच्छ्र, पराक, चांद्रायण इत्यादि व्रतें, पावसाच्या धारांत बसणें, पाण्यांत उभें रहाणें, धूम्रपानादि करणें हीं सर्व साधनें मनांत जी भावना धरून करावी, ती सिद्धि त्याला प्राप्त होते. ९ आतां मंत्रसिद्धीचें लक्षण ऐक. प्रेतावर बसून एक रात्र अनुष्ठान केल्यास प्रेतदेवता प्रसन्न होते. २१० व भूत, भविष्य, वर्तमान या त्रिकाल ज्ञानाची सिद्धि प्राप्त

ते सिद्धी प्राप्त होय जाण। करितां सूर्यमंत्रविधान। दूरदर्शनसिद्धी उपजे ॥ ११ ॥ जैसा मंत्र जैसी बुद्धी। तैसी त्यास प्रकटे सिद्धी। या सकळ सिद्धींची समृद्धी। योगधारणाविधीमाजीं असती ॥ १२ ॥ नेहटूनियां आसना। ऐक्य करोनि प्राणापानां। जो धरी योगधारणा। सकळ सिद्धी जाणा ते ठायीं ॥ १३ ॥ म्यां सांगीतली सिद्धींची कथा। झालिया प्राणापानसमता। आलिया योगधारणा हाता। तैं सिद्धी समस्तां प्रकटती ॥ १४ ॥ प्राणापान समान न करितां। योगधारणाही न धरितां। मज एकातें हृदयीं धरितां। सिद्धी समस्तां दासी होती ॥ १५ ॥ मज पावावया तत्त्वतां। मज एकातें स्मरतां ध्यातां। पावो देऊन सिद्धींचे माथां। चारी मुक्ति स्वभावतां दासी होती ॥ १६ ॥ नाना सिद्धींची धारणा धरितां। माझी सलोकता समीपता। हाता न ये गा सरूपता। मग सायुज्यता ते कैंची ॥ १७ ॥ माझे अतिशयें शुद्ध भक्त। ते मुक्तीसी दूर दवडित। माझेनि भावार्थें नित्यतृप्त। ते पूज्य होत मजलागीं ॥ १८ ॥ जो सकळ सिद्धींचा ईश्वरू। तो मी लागें त्याची पूजा करूं। तेथिला जो सिद्धींचा संभारू। घेऊनि निजव्‍व्हारू पळताती ॥ १९ ॥ सकळ सिद्धींच्या स्वामित्वेंसीं। मी भगवंत तिष्ठें भक्तांपाशीं। तेंचि श्लोकार्थें हृषीकेशी। उद्धवासी सांगत ॥ २२० ॥

सर्वासामपि सिद्धीनां हेतुः पतिरहं प्रभुः। अहं योगस्य सांख्यस्य धर्मस्य ब्रह्मवादिनाम् ॥ ३५ ॥

सकळ सिद्धींचें मी जन्मस्थान। माझेनि सिध्दींचें थोर महिमान। सिध्दींसी मजमाजीं निदान। यापरी मी जाण स्वामी त्यांचा ॥ २१ ॥ जे जीवात्म्याची ऐक्यता। त्या योगाचा स्वामी मी तत्त्वतां। जेथ जीवत्वाची मिथ्यावार्ता। त्या ज्ञानाचाही सर्वथा स्वामी मीचि ॥ २२ ॥ ज्ञानोपदेष्टे जे साधू।

होते. सूर्यमंत्राचें अनुष्ठान केल्यास दूरदर्शनसिद्धि प्राप्त होते. ११ जसा मंत्र आणि जशी बुद्धि असेल तशी सिद्धि प्रकट होते. या सर्व सिद्धींचा ठेवा एका योगधारणेंत असतो, १२ आसन दृढ करून प्राणापानाचें ऐक्य करून जो योगधारणा करितो, त्याला सगळ्या सिद्धि प्राप्त होतात. १३ मीं सिद्धींचे प्रकार सांगतेवेळीं सांगितलेंच आहे कीं, जरी प्राणापानांचें साम्य होऊन योगधारणा होतांच सर्व सिद्धि प्रकट होतात, १४ तरी प्राणापान समान न करितां व योगधारणाहि न धरितां एका मज परमात्म्याला हृदयांत धारण केल्यानें, सगळ्या सिद्धि भक्ताच्या दासी होऊन रहातात, १६ माझ्या स्वरूपाला प्राप्त होण्यासाठीं खरोखर मज एकाचेंच स्मरण व ध्यान केलें असतां सगळ्या सिद्धींच्या डोकीवर पाय देऊन चारी मुक्ति स्वभावतःच दासी होऊन रहातात, १६ अनेक सिद्धींच्या धारणेनें माझी सलोकता, समीपता किंवा सरूपताहि हातीं येत नाहीं; मग सायुज्यतेचें नांव कशाला पाहिजे! १७ जे माझे अतिशय शुद्ध भक्त मुक्तीला दूर झुगारून माझ्या भक्तींतच नित्य तृप्त असतात, ते मला अतिशय पूज्य होतात. १८ मीं जो सगळ्या सिद्धींचा स्वामी, तो त्या भक्ताची पूजा करूं लागतों. तेव्हां सगळ्या सिद्धींचा समूह आपापलें साहित्य घेऊन पळत सुटतो. १९ सगळ्या सिद्धींच्या प्रभुत्वानें मी भगवान् भक्ताजवळ तिष्ठत उभा असतों. हेंच श्रीकृष्ण पुढील श्लोकाच्या अर्थानें उद्धवाला सांगत आहे. २२०.

—'कोणत्या कारणानें?' तें अर्ध्या श्लोकानें सांगतात—

सर्वेसां अपि सिद्धीनां अहं प्रभुः हेतुः पतिः—सर्वहि सिद्धींचा मी प्रभु कारण व पालन करणारा आहें. (हेतु व पति या दोन शब्दांनीं ईश्वराच्या प्रभुत्वाचें उपपादन केलें आहे. शिवाय मी केवळ सिद्धींचाच प्रभु नाहीं तर मोक्षादिकांचाहि प्रभु आहे, असें उत्तरार्धानें सांगतात -) अहं योगस्य सांख्यस्य धर्मस्य ब्रह्मवादिनां च प्रभुः—मी मोक्षाचा, मोक्षसाधनभूत ज्ञानाचा, धर्माचा व धर्मोपदेशक वेदवेत्त्यांचाहि प्रभु आहें. ३५.

सगळ्या सिद्धींचें मी जन्मस्थान आहें. माझ्यामुळें सिद्धींचा एवढा मोठा महिमा वाढला आहे. सिद्धींचा अंतहि माझ्यामध्येंच होतो. याप्रमाणें मी त्यांचा स्वामी आहें. २१ जीवात्म्याचें ऐक्य करणारा जो योग त्याचाहि स्वामी मीच व जीवत्व मिथ्या ठरविणाऱ्या ज्ञानाचाहि स्वामी मीच आहें. २२ ज्ञानाचा उपदेश करणारे जे

त्यांचाही स्वामी मी प्रसिद्धू । माझेनि प्रसादें ज्ञानबोधू । होतसेविशदू सज्ञाना ॥ २३ ॥ उपदेशी उपनिषद्भागें वेदू । त्या वेदाचाही स्वामी मी गोविंदू । मजवेगळा वेद्‌वादू । उच्चारीं शब्दू नुच्चारे ॥ २४ ॥ धर्म म्हणजे ज्ञानसाधन । त्याचाही स्वामी मीचि जाण । मी सबाह्य परिपूर्ण । चैतन्यघन सर्वात्मा ॥ २५ ॥ मी सर्वात्मा सर्वव्याप्त । सबाह्य परिपूर्ण समस्त । हे माझ्या ठायीं सहज स्थित । ऐक सुनिश्चित उध्दवा ॥ २६ ॥

अहमात्माऽऽन्तरो बाह्योऽनावृतः सर्वदेहिनाम् । यथा भूतानि भूतेषु बहिरन्तः स्वयं तथा ॥ ३६ ॥

जीवांच्या जीवामाजीं माझा वास । जीव मजमाजीं सावकाश । माझें स्वरूप गा असमास । गुणमायेस अनावृत ॥ २७ ॥ जेवीं घटाची वस्ती आकाशीं । आकाश सबाह्य त्या घटासी । तेवीं मी जीवमात्रांसी । सबाह्य हृषीकेशी परिपूर्ण ॥ २८ ॥ जैशीं महाभूतें भौतिकांसी । सबाह्य असती । सर्वांसी । तेवीं मी सकळ जगासी । सबाह्य हृषीकेशी पूर्णत्वें पूर्ण ॥ २९ ॥ जीवन जैसें तरंगासी । कां गोडी जैसी गुळासी । तेवीं अनंतकोटि ब्रह्मांडांसी । मी पूर्णत्वेंसी परिपूर्ण ॥ २३० ॥ मज पूर्णाची पूर्णप्राप्ती । निकट येतयेतां हातीं । ते संधी सिध्दी नागविती । भोगसंपत्तीउपचारें ॥ ३१ ॥ ज्याचें रायापाशीं पूर्ण चलन । त्याचे हातां ये लांचु संपूर्ण । तेणेंचि तो पावे मरण । तैसा सिध्दी जाण घातका

साधु त्यांचाहि मीच स्वामी प्रसिद्ध आहें. माझ्याच प्रसादानें ज्ञानी लोकांना ज्ञानाचा स्पष्ट बोध होतो. २३ जो वेद उपनिषदांचा उपदेश करितो, त्या वेदाचाहि मी गोविंद स्वामी आहें. माझ्यावांचून वेदाला एक शब्दहि उच्चारितां येणार नाहीं. २४ धर्म म्हणजे ज्ञानसाधन. त्याचाहि स्वामी मीच आहें, असें समज. मीच आंत-बाहेर परिपूर्ण, चैतन्यघन सर्वात्मा आहें. २५ मी सर्वात्मा सर्वव्यापी आहें. हें उद्धवा ! हें सगळें सबाह्य परिपूर्ण माझ्यामध्यें कसें सहज स्थित आहे, तें निश्चयानें ऐक. २२६.

—कारण—

यथा भूतानि भूतेषु—ज्याप्रमाणें जरायुजादि चतुर्विध प्राणिशरीरामध्यें महाभूतें आंत व बाहेर व्यापून असतात, तथा सर्वदेहिनां आत्मा आन्तरः बाह्य अनावृतः बहिः अन्तः स्वयं अहं—त्याप्रमाणें मी सर्व भूतांचा आत्मा आहें. कारण मी अन्तर्यामी आहें. ('हाच तुझा अंतर्यामी अमृत आत्मा आहे' अशी बृहदारण्यक श्रुति आहे. बृ. ३. ७. तर मग तूं अंतर्यामी असल्यामुळें परिच्छिन्न आहेस ! ' उत्तर– नाहीं–) मी बाह्य म्ह० व्यापक आहें. कारण मी कशानेंहि आच्छादित झालेलों नाहीं, तर मी स्वतः पूर्वोक्त भूतांतील महाभूतांप्रमाणें सर्वांच्या आंत व बाहेर व्यापून राहिलों आहें. ३६.

सर्व प्राण्यांच्या हृदयांत मी रहातों. सगळे जीव माझ्यामध्यें असतात. माझें स्वरूप अमर्याद आहे. तीन गुण व माया यांहून मी अतीत आहें. २७ ज्याप्रमाणें घट आकाशांत असतो, व आकाश त्या घटाला आंतून-बाहेरून व्यापितें, त्याप्रमाणें मी हृषीकेश सगळ्या प्राणिमात्रांत आंत-बाहेर परिपूर्ण व्यापून राहिलों आहें. २८ ज्याप्रमाणें पंचमहाभूतें सगळ्या भौक्तिक पदार्थांत सबाह्य रहातात, त्याप्रमाणें मी परमात्मा सगळ्या जीवांमध्यें सबाह्य पूर्णपणें रहातों. २८ पाण्यावरील तरंग जसे पाण्याच्याच आश्रयानें उद्भवतात किंवा गोडपणा जसा गुळांत भरलेला असतो, तसा मी अनंतकोटि ब्रह्मांडांत पूर्णपणें पूर्णत्वानें भरून राहिलों आहें. २३० अशा मज पूर्णस्वरूप परमात्म्याची प्राप्ति अगदीं हाताजवळ येऊं लागली कीं, त्यावेळीं सिद्धि पुढें येऊन भोग-संपत्ति इत्यादिकांची लालूच दाखवून साधकाला पुरता नागवितात. ३१ राजाशीं ज्याचें पुष्कळ दळण-वळण असतें, त्याला पुष्कळ लांच मिळते व त्यामुळेंच त्याचें मरण ओढवतें. सिद्धि तशाच घातक आहेत, ३२ असें निश्चित समज. त्या सिद्धि माझ्या प्राप्तीला विघ्न करणाऱ्या आहेत. हें सांगण्यासाठींच या अध्यायाचें निरूपण केलें. हे उद्धवा ! ३३ एकाग्र

॥ ३२ ॥ ये अध्यायींचें निरूपण । सांगावया हेंचि गा कारण । माझे प्राप्तीस सिध्दी विघ्न । उध्दवा जाण निश्चिती ॥ ३३ ॥ एकाग्र भजने माझी प्राप्ती । होतां ते संधीसी सिद्धी येती । त्या भुलवोनियां भोगासक्ती । निश्चिती नागविती साधकां ॥ ३४ ॥ जे नेणती माझें निजसुख । ऐसे जे कां केवळ मूर्ख । त्यासीच सिद्धीचें कौतुक । अलोलिक भोगलिप्सा ॥ ३५ ॥ जैसे वेश्येचे हावभाव । तैसें सिद्धीचें वैभव । हें त्यागावया गा सर्व । देवें हा अध्याव निरूपिला ॥ ३६ ॥ ज्यासी प्राप्त माझें निजसुख । त्यासी सिद्धी तुच्छप्राय देख । न देखती जन्ममरणांचें मुख । माझा पूर्ण हरिख कोंदाटे ॥ ३७ ॥ सेवितां सद्गुरुचरण । कोंदाटे ब्रह्म परिपूर्ण । तेथ सिद्धींसी पुसे कोण । हे जाणती खूण हरिभक्त ॥ ३८ ॥ हरिभक्तीसी विकिला भावो भजने फिटला अहंभावो । तेथसिद्धीचा भोगसंदेहो । नुपजे पहाहो सर्वथा ॥ ३९ ॥ भुक्ति मुक्ति ऋद्धि सिद्धी । सद्गुरुचरणीं गा त्रिशुद्धी । हें नेणती जे मंदबुद्धी । ते नाना सिद्धी वांछिती ॥ २४० ॥ सकळ सिद्धींचें साधन । निरपेक्षता सत्य जाण । निरपेक्षाचें अंगण । सिद्धी संपूर्ण ओळंगती ॥ ४१ ॥ सिद्धीची अपेक्षा ज्यांचे चित्ती । सिद्धी त्यांकडे न थुंकिती । निरपेक्षाचे पायींची माती । सिद्धी वंदिती सर्वदा ॥ ४२ ॥ ज्ञानवैराग्य भक्तीचे माथां । सत्य जाण पां निरपेक्षता । ते निरपेक्षता आलिया हाता । मुक्ति सायुज्यता पायां लागे ॥ ४३ ॥ निरपेक्षतेपाशीं सर्व सिद्धी । निरपे-क्षतेपाशीं विधी । निरपेक्षतेपाशीं सुबुद्धी । चरणवंदी अहर्निशीं ॥ ४४ ॥ निरपेक्षता तेथ निर्वाहो । निरपेक्षता तेथ सद्भावो । निरपेक्षतेपाशीं भगवद्भावो । यथार्थ पहावो तिष्ठतू ॥ ४५ ॥ निरपेक्षतेपाशीं उपानिषद्भागू । निरपेक्षतेपाशीं साचार योगू । निरपेक्षता स्वानंदभोगू । सांपडे श्रीरंगू निरपेक्षा ॥ ४६ ॥ एका जनार्दना शरण । त्याचे वंदितां श्रीचरण । चढती निरपेक्षता जाण । सदा संपूर्ण स्वानंदें

भजनानें माझी प्राप्ति होण्याची वेळ आली कीं, त्या संधीला सिद्धि येतात व भोगासक्तीनें भुरळ पाडून साधकाला नागवितात. ३४ जे माझें आत्मसुख जाणत नाहींत, तेच शुद्ध मूर्ख साधक अनिवार भोगेच्छेनें सिद्धींचें कौतुक करितात. ३५ वेश्येचे जसे हावभाव तसेंच सिद्धींचें वैभव; त्यांचा त्याग करण्यासाठीं देवानें हा अध्याय सांगितला. ३६ ज्याला माझें आत्मसुख लाधलें आहे, तो सिद्धींना तुच्छ लेखितो. ज्यांच्यामध्यें माझा निजानंद पूर्ण भरलेला असतो, ३७ ते जन्म-मरणाचें मुखावलोकनहि करीत नाहींत. सद्गुरुचरणाची सेवा केली असतां परिपूर्ण ब्रह्माचा अनुभव येतो, मग तेथें सिद्धींना कोण विचारितो ! ही खूण हरिभक्त जाणतात. ३८ एकदां हरि-भक्तीला भाव विकला, भजनानें 'अहं'-भाव म्ह० देहाभिमान नाहींसा झाला म्हणजे मग तेथें सिद्धींची भोगेच्छा केव्हांहि होत नाहीं. ३९ भुक्ति, मुक्ति, ऋषि-सिद्धि या सगळ्या गुरुचरणांपाशीं असतात, हें ज्या मंदमति लोकांना कळत नाहीं, ते अनेप्रकारच्या सिद्धींची इच्छा करितात. २४० निरपेक्षता हेंच सगळ्या सिद्धींचें साधन आहे, हें अगदीं खरें समज. निरपेक्ष माणसाच्या अंगणांत सिद्धि तिष्ठत बसतात. ४१ ज्याच्या मनांत सिद्धीची इच्छा असते, त्याच्याकडे त्या थुंकूनहि पहात नाहींत. पण निरपेक्ष भक्तांच्या पायांच्या धुळीला सिद्धि सर्वदा वंदन करितात. ४१ ज्ञान-वैराग्ययुक्त भक्तीहूनहि निरपेक्षता श्रेष्ठ आहे. एकदां निरपेक्षता अंगीं बाणली कीं, सायुज्य मुक्ति त्याच्या पायां पडूं लागते. ४३ निरपेक्षतेजवळ सगळ्या सिद्धि, विधि, सद्बुद्धि रात्रंदिवस असतात व तिच्या पायांना वंदन करितात. ४४ जेथें निरपेक्षता असते तेथें योगक्षेम, सद्भाव, भगवद्भाव हीं सगळीं योग्यप्रकारें तिष्ठत असतात. ४५ निरपेक्षतेपाशीं वेदान्त, योग, स्वानंदभोग व मी श्रीरंगहि सांपडतों. ४६ एकनाथ जनार्दनाला शरण जाऊन त्यानें त्यांच्या चरणांना वंदन करितांक्षणीं सदा संपूर्ण स्वानंदांत त्याची निरपेक्षता वाढत गेली. ४७ आमचा

॥ ४७ ॥ आम्हां स्वानंदाचा निजबोधू । हा सद्‍गुरुचरणींचा प्रसादू । महासुखाचा विनोदू । आनंदकंदू श्रीचरणीं ॥ ४८ ॥ गुरुचरणीं करितां भक्ती । अनायासें प्राप्त चारी मुक्ती । निजशांतीसी विरक्ती । सेवा मागती गुरुभक्त ॥ ४९ ॥ एका जनार्दना शरण । त्याचे कृपेस्तव जाण । श्रीभागवताचें निरूपण । झाला संपूर्ण पंधरावा ॥ २५० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां सिद्धिनिरूपणयोगो नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ श्रीकृष्णार्पण०

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे श्रीकृष्णोद्धवसंवादे पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥

हा स्वानंदानुभव म्हणजे सद्‍गुरुचरणांचा प्रसादच आहे. श्रीगुरुचरण आनंदाचा कंद आहेत. ४८ म्हणून हा महासुखाचा विनोद लाभला. गुरुचरणांची भक्ति केली असतां अनायासें चारी मुक्ति प्राप्त होतात व विरक्ति शांतीसह गुरुभक्तीची सेवा इच्छिते. ४९ एकनाथ जनार्दनस्वामींना शरण आहे. त्यांच्याच कृपेनें श्रीभागवताच्या पंधराव्या अध्यायाचें निरूपण संपूर्ण झालें. २५०.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील
सिद्धिनिरूपणयोग नांवाचा पंधरावा अध्याय समाप्त झाला.